


रायगड, रविवार, दि. १ सप्टेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

विकणे आहे
१८०० स्क्वे.फुटाहून अधिक एरिया असलेला पहिल्या मजल्यावरील ६ गाळे विकणे आहे. दुकान, बँक, क्लासेस, ऑफिसेस, जिम, एजन्सी, गोडाऊनसाठी साठी अतिशय उत्तम असलेली ही जागा शहराच्या अगदी मध्यवर्ती आहे. अलिबाग एस.टी.स्टँडपासून अगदी जवळ.
संपर्क - 8108498818 / 9224245554 / 9224244999

## रेशनवरील तांदूळ होणार बंद?

**नवी दिल्ली** : केंद्र सरकार देशातील गरजूंना रेशनकार्डद्वारे मोफत रेशन देते. यामध्ये शिधापत्रिकाधारकांना मोफत तांदूळ दिला जातो. मात्र, त्यात मोठा बदल करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. मोफत तांदूळ देण्याऐवजी आता इतर नऊ वस्तू देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यामध्ये गहू, डाळी, हरभरा, साखर, मीठ, मोहरीचे तेल, मैदा, सोयाबीन आणि मसाले यांचा समावेश आहे. लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्यांच्या आहारातील पोषणाची पातळी वाढविण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. मोफत रेशन योजनेंतर्गत जवळपास ९० कोटी लोकांना मोफत रेशन दिले जाते. यामध्ये लोकांना पूर्वी मोफत तांदूळ दिला जात होता. मात्र, आता यात बदल करण्यात आला आहे.

## मुलीची छेडछाड, आरोपीवर गुन्हा

**पनवेल** : अल्पवयीन मुलीसमोर प्रेम व्यक्त करणं एका रोमियो चांगलंच महागात पडलं आहे. महेश लोखंडे असं रोमियोचे नाव असून, त्याच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांनी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कळंबोली येथे राहणाऱ्या एका १२ वर्षीय मुलीला लोखंडे हा मागील दीड ते दोन महिन्यांपासून त्रास देत होता. सुरुवातीला दुर्लक्ष केल्यानंतरही आरोपीने पीडित मुलीला त्रास देणे सुरूच ठेवल्याने त्रासलेल्या तरुणीने संबंधित बाब आपल्या घरच्यांना सांगितली. शुक्रवारी (दि. ३०) देखील आरोपीने मुलीची छेड काढत 'मला तू आवडतेस' असं सांगितले. यावेळी मुलीच्या मागावर असलेल्या तिच्या वडिलांनी पान २ वर

# करोडोंचा निधी खर्चाविना

### नऊ कोटींचा वितरीत निधी खर्च करण्यात शासकीय यंत्रणा उदासीन

### सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद बांधकाम विभागाला निधी वर्ग

**। अलिबाग। प्रमोद जाधव ।**

**अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासाठी समाजकल्याण विभागाकडून निधी देण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत (अनुसूचित जाती उपयोजना) रस्ता, साकव आदी विविध कामांसाठी नऊ कोटी २६ लाख रुपयांचा निधी वितरीत केला आहे. निधी वितरीत होऊन अनेक महिने उलटूनही खर्च करण्यास ही यंत्रणा उदासीन ठरली आहे. त्यामुळे हा लालफितीत अडकून असल्याचे चित्र आहे.**



**निधीबाबत बांधकाम अधिकारी अनभिज्ञ**

या निधीच्या खर्चाबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, निधीबाबत त्यांना काहीच माहिती नसल्याचे सांगण्यात आले. त्याच्या नियोजनाबाबतही ते अनभिज्ञ असल्याचे समोर आले आहे.

**विभागनिहाय वितरित निधी**

| | |
|---|---|
| जिल्हा परिषद बांधकाम विभाग | 5,68,00,000 |
| सार्वजनिक बांधकाम विभाग | 3,57,00,000 |

रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अखत्यारित पाच हजार किलोमीटरचे रस्ते आहेत. यातील दोन हजारांहून अधिक रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. दरम्यान, अंतर्गत खड्डेमय रस्त्यांमुळे ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यात सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता अलिबाग, पनवेल व महाड यांच्या अखत्यारित सुमारे आठ हजार किलोमीटरचे रस्ते आहेत.

अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत करोडो रुपयांचा निधी दिला जातो. यावर्षीदेखील समाजकल्याण विभागाकडून पान २ वर

# पीएनपी जलवाहतूक आजपासून होणार सुरु

### गणेशभक्तांसह पर्यटकांना दिलासा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पावसाळ्याच्या दिवसात गेली तीन महिने बंद असणारी मांडवा ते मुंबई पीएनपी कॅटमरन फेरी बोटसेवा रविवार, दि.१ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे, अशी माहिती पीएनपी व्यवस्थापनाकडून देण्यात आली आहे. गौरी गणपतीनिमित्ताने अलिबाग, मुरुड येथे येणाऱ्या चाकरमान्यांसह पर्यटकांचाही प्रवास सुखकर होणार आहे. त्याचप्रमाणे रस्तेमार्गे तीन-चार तासांच्या दगदग आणि त्रासदायक प्रवासातून सुटका होणार असल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पावसाळ्यामध्ये तीन महिने जलवाहतूक सेवा बंद करण्यात आली होती. त्यामुळे प्रवाशांना एसटीतूनच प्रवास करावा लागला. मुंबईत खरेदीसाठी जाणाऱ्या व्यावसायिकांसह नागरिकांचे प्रचंड हाल झाले होते. तसेच मुंबईतून अलिबागला येणारे व अलिबागहून मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांसह पर्यटकांना जलवाहतुकीअभावी पेण, पनवेलमार्गे तीन ते चार तास प्रवास करावा लागला होता. पावसाळा संपत आल्यानंतर हवामान आणि समुद्राच्या लाटांचा अंदाज घेऊन मेरिटाईम बोर्ड ही सेवा सुरू करण्याबाबत निर्णय घेत असते. दरम्यान, जलवाहतूक सुरू होत असल्याने पर्यटकांची संख्याही पान २ वर



# मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी तरुणांनी पुढे यावे

### शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे प्रतिपादन

**। पेण । प्रतिनिधी ।**

मुंबईचा विचार केला तर आगरी-कोळी मराठी माणूस हा येथील मूल रहिवासी, मात्र बदलत्या काळाच्या प्रवाहात हा माणूस मुंबईमधून हद्दपार झाला आहे. या धर्तीवर आज नवी मुंबई तिसरी मुंबई येऊ घातलेली आहे. त्या नव्या बदलात आज येथील जमिनी घेतल्या जात असून, येथील स्थानिक आगरी-कोळी मराठी माणूस हद्दपार होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. या आगरी-कोळी मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी व्यापक दूरदृष्टी असलेल्या तरुणांनी, उच्चशिक्षित वर्गाने पुढे येऊन समाजात काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांनी केले.



माजी खासदार बॅ. ए.टी. पाटील यांच्या १०१व्या जयंतीनिमित्त अतुल नंदकुमार म्हात्रे प्रतिष्ठान यांच्यावतीने पेण येथील आगरी समाज हाल येथे बॅ. ए.टी. पाटील जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमासाठी जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन सुरेश खैरे, डॉ. सिद्धार्थ पाटील, शेकापचे माजी नगरसेवक अजित साळुंके, प्रकाश शिंगरुत, महेंद्र ठाकूर, पेण पं.स.चे माजी सभापती महादेव दिवेकर, चंद्रकात पाटील, काँग्रेस नेत्या नंदा म्हात्रे, सूर्यकांत पाटील, ॲड. रोशन पाटील, शिवसेनेचे विधानसभा प्रमुख अविनाश म्हात्रे, शिवसेनेचे तालुका प्रमुख जगदीश ठाकूर, निवृत्त न्यायाधीश दामोदर म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, गेली ४० वर्षे राज्याच्या विधिमंडळात गरीब, कष्टकरी, शेतकरी वर्गाच्या भल्यासाठी आपण कायदे करीत आहोत. पान २ वर

## पुढील चार दिवस पावसाचे

### रायगडला यलो अलर्ट

**पुणे** : पुढील चार दिवस म्हणजेच १ ते ४ सप्टेंबरदरम्यान रायगड जिल्ह्यासह रत्नागिरी, पुणे, सातारा जिल्ह्याला जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला असून, यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्याला ३ ते ४ सप्टेंबरदरम्यान, तर कोल्हापूर जिल्ह्यासाठी ४ सप्टेंबरला यलो अलर्ट राहील, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. 'असना' चक्रीवादळ भारतीय किनारपट्टीपासून दूरवर गेले असून, ते ईशान्य आणि लगतच्या वायव्य अरबी समुद्रावर घोंघावत आहे. त्या पार्श्वभूमीवर बंगालच्या उपसागरात एक वादळी प्रणाली निर्माण झाली आहे.

## रेवस-भाऊचा धक्का बोट सेवाही सुरू

### तिकीट दरात २५ रुपये कपात

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण-भाऊचा धक्कादरम्यान २६ मेपासून पावसाळी हंगामात वाढविण्यात आलेल्या तिकीट दरात १ सप्टेंबरपासून २५ रुपयांची कपात करण्यात आली आहे. मागील तीन महिने पावसाळी हंगामात बंद करण्यात आलेली रेवस-भाऊचा धक्का या सागरी जलमार्गावरील १ सप्टेंबरपासून प्रवासी बोट सेवा पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे. ऐन गणपती सणातच तिकीट कपात आणि रेवस सागरी मार्गावरील सुरू होणाऱ्या प्रवासी वाहतुकीमुळे अलिबाग-कोकणात पान २ वर




## विद्यार्थ्यांवर अतिप्रसंग

### निवासी शाळेतील घटना, पोलिसात गुन्हा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळेतील १२ वर्षीय मुलासोबत त्याच शाळेतील दोन १४ वर्षीय मुलांनी गैरवर्तन केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, तिघांनाही जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

राज्यात महिला, मुलींवरील अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. दरम्यान, महिला व शाळकरी मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असतानाच रायगड जिल्ह्यातदेखील दोन मुलांनी एका मुलावर अतिप्रसंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्याच्याशी गैरवर्तन केल्याची माहिती माणगाव पोलिसांनी दिली आहे. ही घटना २८ ऑगस्ट रोजी रात्री घडल्याचे समोर येत आहे. या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पीडित व अत्याचार करणारे अल्पवयीन असल्याने त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.

# लाडक्या बहिणीला लाभाची प्रतीक्षा

### ■ जिल्हाभरात पाच लाख महिलांचे ऑनलाईन अर्ज

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत होती. आतापर्यंत जिल्ह्यात पाच लाख २२ हजार महिलांनी या योजनेसाठी अर्ज भरले आहेत. काही बहिणींच्या खात्यात पैसे जमा झाले; परंतु काहींना प्रतीक्षा लागून राहिली आहे.

**ई केवायसी करण्यासाठी गर्दी**

**जिल्ह्यात रक्षाबंधनाच्या निमित्ताने काही महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे दीड हजार रुपये याप्रमाणे दोन महिन्यांचे तीन हजार रुपये जमा करण्यात आले. त्यांना मोबाईलवर मेसेज आला. परंतु, काही महिलांना ई केवायसी न केल्याचा फटका बसला आहे. पैसे काढण्यासाठी गेल्यावर ई केवायसी न केल्याने जमा झालेले पैसे मिळण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे अनेक महिला ईकेवायसी करण्यासाठी बँकेत गर्दी करीत असल्याचे चित्र आहे.**

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली. एक जूनपासून या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. बंद असलेले खाते पूर्ववत चालू करण्यासाठी महिलांनी बँकांमध्ये गर्दी केली होती. तसेच शाळा सोडल्याचा दाखलादेखील मिळविण्यासाठी शाळांमध्ये धावाधाव सुरु पान २ वर

## अलिबागमध्ये तिघांची आत्महत्या

**अलिबाग** : तालुक्यात तिघांचा अकस्मात मृत्यू झाला आहे. यातील दोघांनी विषारी औषध, तर एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती समोर येत आहे. या तिन्ही घटना शुक्रवार व शनिवारी या दोन दिवसांत घडल्या आहेत. याप्रकरणी अलिबाग व रेवदंडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची पान २ वर

## मुलीवर अत्याचार; आरोपीला अटक

**पनवेल** : खारघर भागात राहणाऱ्या तरुणाने त्याच भागातील अल्पवयीन मुलीसोबत मैत्री करुन जबरदस्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. पीडित मुलीने त्याच्यासोबत शरीरसंबंध ठेवण्यास नकार दिल्यानंतर या तरुणाने तिला मारहाण करुन व्हॉट्सॲपवरुन तिला मेसेज पाठवून भररस्त्यात प्रेग्नेंट करण्याची धमकी दिली. अक्षत सोनावणे (२०) असे या तरुणाचे नाव असून, खारघर पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्कारासह विनयभंग तसेच पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

या प्रकरणातील आरोपी अक्षत सोनावणे आणि पीडित तरुणी दोघेही खारघरमध्ये राहण्यास आहेत. २०२० मध्ये पीडित मुलगी अल्पवयीन असताना अक्षतने तिच्यासोबत मैत्री केली होती. त्यानंतर त्याने तिच्याकडे वारंवार शारीरिक संबंध ठेवण्याची मागणी केली. त्यावेळी पान २ वर






## मुख्यमंत्रीसाहेब, १२ वाड्यांच्या बहिणी लाडक्या नाहीत का?

# आदिवासींची उपेक्षा अजूनही सुरूच

**। नेरळ । वार्ताहर ।**

**कर्जत तालुक्यातील सह्याद्रीच्या डोंगर रांगेत माथेरानच्या कुशीत वसलेल्या १२ वाड्यांमधील नागरिकांची आजही उपेक्षा सुरूच आहे. काही दिवसांपूर्वी उपचाराला विलंब झाल्याने साप चावलेल्या महिलेचा मृत्यू झाला असताना आता गरोदर मातेला रुग्णालयात नेण्यासाठी आसलवाडी ग्रामस्थांना झोळीचा आधार घ्यावा लागला आहे. तर बाळासोबत परत येतानादेखील झोळीतूनच न्यावे लागले आहे. रस्त्याच्या कामाला अजूनही सुरुवात झालेली नाही. त्यामुळे या १२ वाड्यांमधील बहिणी मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी नाहीत का, असा जळजळीत सवाल येथील आदिवासी बांधवानी उपस्थित केला आहे. दरम्यान, ग्रामीण विकास यंत्रणेकडून मंजूर रस्त्याच्या कामाला अद्याप सुरुवात नसल्याने याबाबत येथील ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.**



कर्जत तालुक्यातील जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या माथेरान डोंगराच्या कुशीत अनेक आदिवासी वाड्या वस्त्या आहेत. मात्र एका बाजूला देशाचा अमृतमहोत्सव साजरा होऊन देखील दुसरीकडे या वाडयांना साधा रस्ता उपलब्ध होऊ शकला नाही. तेव्हा या वाडयांना रस्ता उपलब्ध व्हावा यासाठी अनेकदा आदिवासी समाजाने आंदोलने, उपोषणे, रास्ता रोको केले. बेकरेवाडी, किरवलीवाडी, असालवाडी, नाण्याचा माळ, मण्याचा माळ, यासह १२ वाड्या रस्त्याविना संघर्षमयी जीवन जगत आहेत. तर एखाद्या रुग्णाला रुग्णालयात नेताना झोळी करून न्यावी लागत असल्याने त्यात वेळ जाऊन रुग्ण दगावण्याचा घटना घडत असल्याने आदिवासी समाज संतप्त झाला आहे. दि. १५ जुलै रोजी आसलवाडी येथे राहणारे सांबरी कुटुंबातील विठाबाई यांना साप चावला होता. मात्र, रुग्णालयात नेण्यासाठी त्यांना वाडीतून झोळीतून न्यावे लागले आणि उपचाराला विलंब होऊन त्यात त्यांचा जीव गेला. तर, दि. २७ ऑगस्ट रोजी आसलवाडी काशी सचिन पिरकड या गरोदर मातेला त्रास होऊ लागल्याने तिला नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात न्यावे लागले. मात्र, रस्त्याअभावी तिला झोळी करून न्यावे लागले. सुदैवाने ती वेळेत प्राथमिक आरोग्य केंद्रात पोहचून तिला उपचार मिळाले. तर तिची प्रसूती होऊन तिला मुलगी झाली. बाळासह परत या मातेला घरी आणण्यासाठी झोळीतून आणावे लागले आहे. येथील

### • गरोदर मातेला रुग्णालयात नेण्यासाठी झोळीचा आधार

**बारा वाड्या रस्त्याविना**

**आजच्या प्रगत भारत देशात तब्बल १२ वाडयांना रस्ता नाही ही मोठी शोकांतिका आहे. रस्त्याला निधी मंजूर असून, अजून कामाला सुरुवात झालेली नाही, त्यामुळे आदिवासी बांधवांच्या पदरी निराशा पडते की काय, अशी शंका उपस्थित केली जात आहे. तर दुसरीकडे रस्त्याअभावी येथील नागरिकांच्या जीवावर बेतत असल्याचे भयानक वास्तव आहे. अशात प्रशासन उघड्या डोळ्यांनी हे मृत्यू कुठवर पाहत राहणार, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.**

१४ कोटी रुपये मंजूर असलेल्या रस्त्याच्या कामाला अद्याप सुरुवात नाही. कधी ग्रामीण विकास यंत्रणा तर कधी वनविभाग यांची अडचण सांगून वेळ मारली जात आहे. पण रस्ता होणार केव्हा? जर रस्ता होणार नव्हता, तर राज्याचे मुख्यमंत्री यांनी ऑनलाईन भूमीपूजनाचा घाट एवढ्या लवकर का घातला, असा प्रश्न आदिवासी संघटनेचे अध्यक्ष जैतू पारधी व गणेश पारधी उपस्थित केला आहे. तर, याबाबत ग्रामीण विकास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

> **“राज्य शासनाने नुकतीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्यात लागू केली. ही योजना घोषित केली आणि महिलांना पैसेदेखील आले. मात्र आम्हाला पैसे नको तर रस्ता हवा आहे. आमच्या येथील माथेरानच्या कुशीत वसलेल्या १२ वाड्यांच्या रस्त्याचे मुख्यमंत्री महोदय यांनी ऑनलाईन भूमिपूजन केले, मात्र त्याला आठ महिने लोटूनदेखील रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली नाही. दिवसागणिक रस्ता नसल्याने येथील नागरिकांच्या जीवावर बेतत आहे. तेव्हा शासनाने आमची विनंती स्वीकारावी आणि आम्हाला लवकर रस्ता करून द्यावा.**
> **– जैतू पारधी, ग्रामस्थ,”**

# तलाठ्यांचे काम बंद आंदोलन



■ (छायाचित्र : धम्मशील सावंत)

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

राज्यात तलाठीवर्गाच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस ऐरणीवर आला आहे. आडगांव रंजे, ता. वसमत, जि. हिंगोली येथील तलाठी संतोष देवराव पवार यांची तलाठी कार्यालयातच भरदिवसा निर्घृण हत्या करण्यात आल्याने तलाठीवर्गातून निषेध आणि संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. तलाठ्याची कर्तव्य बजावत असताना झालेल्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ सुधागड पालीत गुरुवारी (दि.२९) तलाठ्यांनी एकदिवसीय काम बंद आंदोलन केले. यावेळी आपल्या मागणीचे निवेदन पाली तहसीलदारांना देण्यात आले.

तलाठी संतोष देवराव पवार यांचा शासकीय कामकाज करत असतांना डोळ्यात मिरची पूड टाकून चाकू भोसकून खून करण्यात आला. या घटनेचा रायगड जिल्हा तलाठी संघाकडून निषेध व्यक्त करण्यात आला. आरोपीला कठोर शिक्षा आणि तलाठ्याच्या कुटुंबाला ५० लाखांची विशेष आर्थिक मदत शासनाने तात्काळ जाहीर करावी, तसेच ३५३ अजामीनपत्र गुन्हा जामीनपात्र करण्यात आला आहे, या कायद्यात दुरुस्ती होऊन अजामीनपात्र करण्यात यावा, अशी महत्त्वाची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी दत्तगुरू सरनाईक, संजय बुरंबे, मंडळ अधिकारी अंकुश साळवी, शिरीष तांबटकर, मारुती मळेकर, रवींद्र बाईत, नितीन शेळके, दामोदर शिंदे, वैभव आंबरे, प्रवीण भोईर, शिवाजी केंद्रे, उद्धव गुंजाळ, कविता म्हशीलकर, विमल घोळगे, स्वरा रायकर ,अनंता वारगुडा, अमिता गावंड आदींसह तलाठी मंडळ अधिकारी उपस्थित होते.

# सावळे येथे विद्यार्थ्यांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन

**। रसायनी । वार्ताहर ।**

राज्य शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे ज्ञानवर्धिनी माध्यमिक विद्यालय सावळे रसायनी या विद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सभेचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, पालक, माता मालक, अंगणवाडी सेविका, वैद्यकीय अधिकारी, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, ग्रामपंचायत सावळे, देवलोली, नारपोली, जाताडे सदस्य, रा.जि.प. सावळे, बचत गट महिला, शालेय पोषण आहार बचत गट महिला, आशा वर्कर, गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच रसायनी पोलीस ठाण्याचे एपीआय प्रमोद जाधव, जाधव मॅडम, पोलीस मंगेश लांगी, पोलीस महिला कर्मचारी चोबळे मॅडम, माजी सभापती गजानन माळी, सरपंच सुनिल माळी, काशिनाथ कांबळे आदी उपस्थित होते.

शाळा, शाळेतील विद्यार्थी सुरक्षिततेबाबतची माहिती एपीआय प्रमोद जाधव यांनी दिली. तर महिला पोलीस जाधव मॅडम, कांबळे मॅडम यांनी पालकांना मार्गदर्शन करत कुठे सीसीटीव्ही कॅमेरे, तक्रार पेटी, बंधनकारक असल्याचे सांगितले. तसेच स्थानिक स्कूल समितीच्या सदस्यांनीदेखील याबाबत पालकांना सांगितले. तसेच महिला रेखा पवार यांनी महिला प्रतिनिधित्व म्हणून उपस्थितांना सुरक्षेबाबत माहिती दिली.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. राजपूत यांनी विद्यार्थी सुरक्षिततेबाबत विद्यार्थी, पालक, शिक्षक, ग्रामस्थ सर्वांनी सजगता बाळगणे गरजेचे आहे. त्यावर आपणच आपल्या मुलांची योग्य काळजी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३५ वर्षीय तरुण हरवला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील दहिवली गावातील शिवाजी महाराजनगर मध्ये राहणारे ३५ वर्षीय दीपक अनिल शिंदे हे १५ मे २०२४ पासून हरवले आहेत. ते हरवले असल्याची तक्रार कर्जत पोलीस ठाण्यात नोंद आलीआहे.



कर्जत पोलीस ठाण्यात दीपक शिंदे यांच्या मातोश्री संगीता अनिल शिंदे यांनी मुलगा हरवला असल्याची तक्रार दिली आहे. दीपक यांचे वय-३५ वर्षे, बांधा-मध्यम, रंग-गोरा, उंची ५ फूट ४ इंच, केस काळे, पुढील बाजूस टक्कल पडलेले, अंगात राखाडी रंगाचा उभ्या लाईन असलेला फुल शर्ट व ब्लू जिन्स पॅन्ट, पायात प्लास्टिकची चप्पल, उजव्या हाताचे स्कुटी चालवताना मनगटाचे हाड मोडलेले असून, त्यावर टाके असलेल्या खुणा दिसत आहेत. त्यांच्याबद्दल कोणतीही माहिती मिळाल्यास कर्जत पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधण्याचे आव्हान पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी केले आहे.

# उरण शहरात वाहतूक कोंडी नित्याचीच




**। उरण । वार्ताहर ।**

उरण शहरातील वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली असून, सकाळी आणि सायंकाळच्या वेळेस वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचा त्रास हा नाहक सर्वसामान्य नागरिकांना, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे. यासंदर्भात अनेक वेळा उपाययोजना करण्यासाठी आंदोलन करण्याचा इशारा संबंधितांकडून देण्यात आला. परंतु, आजतागायत कोणत्याही प्रकारचे आंदोलन उभारण्यात आले नाही.त्यामुळे उरणकरांची अवस्था रोज मरे त्याला कोण रडे अशी झाली आहे.

वाढत्या औद्योगिकीकरण आणि नागरीकरण यामुळे उरण शहराची लोकसंख्या जवळपास पन्नास हजारांच्या घरात गेली असून, प्रत्येकाच्या घरी दोन-चार दुचाकी आणि एक चारचाकी वाहन झाले आहे. त्यामानाने शहरातील रस्त्यांची संख्या वाढली नाही. त्यातच संथ गतीने सुरू असलेला बायपास रस्त्याचे काम, राजपाल नाका, आपणा बाजार, पालवी रुग्णालय या महत्त्वाच्या रस्त्यावर बेशिस्तपणे पार्किंग करण्यात येणारी वाहने, उरण नगर परिषद, वाहतूक पोलीस तसेच संबंधित प्रशासनात समन्वयाचा अभाव त्यामुळे शहरातील रस्त्यांचे काही अंशी रुंदीकरण व कॉंक्रिटीकरण होऊन ही गेल्या दोन-चार वर्षात वाहतुकीची कोंडी वाढत चालली आहे. तरी गणेशोत्सवापूर्वी उरण शहरातील वाहतूक कोंडीवर ठोस उपाययोजना करण्यासाठी उरणचे लोकप्रतिनिधी, उरण नगर परिषद, वाहतूक पोलीस, संबंधित प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पान १ वरून

## करोडोंचा निधी खर्चाविना

रस्ते वाहतूक दळणवळणासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागाला नऊ कोटी २६ लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला आहे. त्यामध्ये जिल्हा परिषदेला पाच कोटी ६८ लाख रुपयांचा निधी, तर अलिबाग, पनवेल व महाड येथील कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाला तीन कोटी ५७ लाख रुपयांचा निधी दिल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

निधी देऊन अनेक महिने उलटून गेले आहेत. मात्र, अनुसूचित घटकांच्या विकासासाठी निधीच खर्च झाला नसल्याची माहिती समोर येत आहे. जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणारे अनेक रस्ते खराब असून, साकवांचीदेखील दुरवस्था झाली आहे. काही ठिकाणी साकवची गरज असतानाही त्याठिकाणी साकव उभारले नाहीत. त्याचा परिणाम या घटकाच्या विकासावर होत असल्याचे चित्र आहे.

## पीएनपी जलवाहतूक आजपासून होणार सुरु

वाढणार आहे. गणरायाच्या आगमनाला अवघे सहा दिवस शिल्लक राहिले आहेत. गणेशोत्सवादरम्यान प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी पीएनपी कॅटमरनद्वारे जलवाहतूक सेवा सुरु केली जाणार आहे. एक सप्टेंबरला याची सुरुवात केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रेवस-भाऊचा धक्का बोट सेवाही सुरू

जाणाऱ्या हजारो भाविकांना दिलासा मिळणार असून, गैरसोय दूर होणार आहे.

दरवर्षी पावसाळी हंगामात भाऊचा धक्का-उरण या मार्गावरील प्रवासी तिकीट दरात वाढ केली जाते. त्यामुळे २६ मेपासून भाऊचा धक्का-उरण या सागरी मार्गावरील तिकीट दरात ८० रुपयांवरुन १०५ अशी २५ रुपयांनी वाढ केली होती. पावसाळी हंगामानंतर १ सप्टेंबरपासून उन्हाळी हंगामासाठी तिकीट दरात २५ रुपये कपात करण्यात आली आहे. १ सप्टेंबरपासून या मार्गावरील तिकीट दर प्रौढांसाठी ८० तर लहानांसाठी ३९ रुपये आकारण्यात येणार आहे.

जून ते ३१ ऑगस्टदरम्यान तीन महिन्यांसाठी या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक बंद ठेवण्यात आलेली प्रवासी बोट सेवा १ सप्टेंबरपासून सुरू करण्यात येणार आहे. हवामानाचा अंदाज घेऊन आणि जसजशी प्रवासी संख्येत वाढ होईल, तशी लॉंचेसच्या फेऱ्या वाढविण्यात येणार असल्याची माहिती मुंबई जलवाहतूक संस्थेचे सचिव जमीर बामणे यांनी दिली.

ऐन गणपती सणातच १ सप्टेंबरपासून भाऊचा धक्का-उरण सागरी मार्गावरील तिकीट दरात करण्यात आलेली २५ रुपयांची कपात आणि सुरू होणाऱ्या रेवस-भाऊचा धक्कादरम्यानच्या प्रवासी लॉंचेसमुळे अलिबाग-कोकणात जाणाऱ्या हजारो भाविकांना दिलासा मिळणार आहे.

## अलिबागमध्ये तिघांची आत्महत्या

नोंद करण्यात आली आहे. वढाव बुद्रुक येथील ३१ वर्षीय तरुणाने शेतामध्ये जाऊन गवत मारण्याचे औषध खाल्ले. त्यामध्येच त्याचा मृत्यू झाला. तालुक्यातील बोरपाडा येथील २६ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. तसेच कार्लेखिंड येथेदेखील एका तरुणाने विषारी औषध खाऊन आपले जीवन संपविल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी तरुणांनी पुढे यावे

आजकालच्या ओघात हा वर्ग संकटात सापडला आहे. या वर्गाच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. अशा माणसांना स्वाभिमानाने उभे करण्यासाठी बॅ. ए.टी. पाटील यांनी अव्याहतपणे काम केले, ते काम पुढे नेण्यासाठी समाजातील तरुणांनी, उच्च शिक्षित वर्गाने पुढे येऊन काम करण्याची गरज आहे. अतुल म्हात्रेंसारखा व्यापक दूरदृष्टी असलेला तरूण आज हे काम करत आहे, ही समाधानाची बाब आहे. नवी दृष्टी असलेले असे तरुणच या समाजाला नवी दिशा देऊ शकतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी सूर्यकांत पाटील यांनी बॅ. ए.टी पाटील यांच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकला.तर, डॉ. सिद्धार्थ पाटील यांनी आपल्या वडिलांच्या विचारांची थोरवी विशद करताना अनेक आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाच्या शेवटी अतुल म्हात्रे यांनी बॅ. ए.टी. पाटील यांचे समाजासाठीचे कार्य किती मोठे आहे हे सांगून आज ते पुढे नेण्याची गरज असल्याचे सांगितले. आज येथील लोकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. या प्रश्नाची कायमची सोडवणूक करून येथील शेतकरी संपन्न कसा होईल यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

**अतुल म्हात्रे बॅ. ए.टी. पाटलांच्या विचारांचे वारसदार : डॉ. पाटील**

बॅ.ए.टी पाटील यांचे चिरंजीव डॉ.सिध्दार्थ पाटील यांनी अतुल म्हात्रे हे खऱ्या अर्थाने बॅ.ए.टी. पाटील यांच्या विचारांचे वारसदार आहेत. त्यांनी साहेबांच्या विचारांना प्रेरित होऊन लंडन येथे जाऊन मास्टरकी मिळवली. आणि, त्या मास्टरकीचा उपयोग आपल्या समाजबांधवांना कसा होईल यासाठी ते आता अहोरात्र मेहनत घेत आहेत. साहेबांनीदेखील समाजबांधवांच्या हितासाठी आपले पूर्ण आयुष्य वेचले. अतुल म्हात्रे हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे हित पाहण्यासाठी आणि हित करण्यासाठी मैदानात उतरले आहेत.

## लाडक्या बहिणीला लाभाची प्रतीक्षा

झाली होती. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यामुळे लाडक्या बहिणींची अर्ज भरण्यासाठी लगबग सुरु होती. अंगणवाडी सेविकांच्या मदतीने अर्ज भरण्याचे काम करण्यात आले. शहरी भागात काही नगरपालिकांनी वायफायसेवा उपलब्ध करून या योजनेचे अर्ज भरून घेतले. जिल्ह्यात आतापर्यंत पाच लाख २२ हजार महिलांनी अर्ज भरले आहेत. यातील काही महिलांना योजनेचा लाभ मिळाला आहे. तर, काही महिलांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. ऑगस्ट महिना संपला तरीदेखील पैसे जमा न झाल्याने काही महिलांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाली आहे.

## मुलीवर अत्याचार;आरोपीला अटक

सदर मुलीने त्याला नकार दिल्यानंतरदेखील आरोपी अक्षत याने तिच्यासोबत दोन वेळा जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. मात्र, त्यानंतरदेखील तिने त्याच्यासोबत कायम शरीरसंबंध ठेवावेत यासाठी आरोपी अक्षतने तिच्या पाठीमागे तगादा लावला होता. मात्र, पीडितेने नकार दिल्यानंतर अक्षतने तिला मारहाण केली. तसेच तिला व्हॉट्सॲपवरुन मेसेज पाठवून भररस्त्यात प्रेग्नेंट करण्याची धमकी दिली. अक्षतकडून अशा पद्धतीने वारंवार त्रास देण्यात येत असल्याने अखेर पीडित मुलीने खारघर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अक्षतला अटक केली आहे.

## मुलीची छेडछाड, आरोपीवर गुन्हा

याबाबत संबंधित आरोपीला जाब विचारताच आरोपी तरुण एका दुकानात लपून बसला. काही वेळाने याबाबतची माहिती पोलिसांना कळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तोपर्यंत घटनास्थळी संतप्त नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेताच संतप्त नागरिकांनी पोलिसांसमोरच आरोपीची चांगलीच धुलाई केली. बदलापुरात घडलेली घटना ताजी असतानाच कळंबोलीमध्ये घडलेल्या घटनेमुळे वातावरण तापू नये याकरिता कळंबोली पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीविरोधात तात्काळ गुन्हा दाखल केल्याने कळंबोली पोलिसांचे कौतुक होत आहे.

# मोरबे धरणात आयुक्तांच्या हस्ते जलपूजन

**। रसायनी । वार्ताहर ।**

नवी मुंबई महानगर पालिका पूर्ण क्षेत्रातील व पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील खारघर व कामोठे विभागांना पाणीपुरवठा करणारे चौक येथील मोरबे धरणाचा जलाशय साठा पूर्ण झाल्याने नवी मुंबई महानगर पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते व माजी मंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत जलपूजन पार पडले.



संपूर्ण नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्र व पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील खारघर आणि कामोठे विभागांना पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात आहे. गेले काही दिवस तुफान पावसामुळे धरण काठोकाठ भरले. पाणी साठवण्याची क्षमता १९०.८९० द.ल.घ.मी. इतकी असून, विसर्ग पाणी पातळी ८८.०० मीटर इतकी आहे. पाणीसाठा पूर्ण झालेला आहे, त्यामुळे धरणाचे दोन्ही वक्राकार दरवाजे उघडण्यात आले, त्यामुळे जादाचे पाणी मुळ धावरी नदीच्या पात्रात सोडण्यात आले. नवी मुंबई महानगर पालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी धरणातील पाण्याची शुक्रवार दि.३० रोजी विधिवत पूजा केली, पाणी पुरवठा कायमस्वरूपी राहण्यासाठी राज त्यांनी प्रार्थना केली. यावेळी माजी मंत्री गणेश नाईक उपस्थित होते. यावेळी गणेश नाईक व उपस्थित अधिकारी यांनी धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याची आणि धरण परिसराची पाहणी केली.

## आरोपीस कारावास

**। रसायनी । वार्ताहर ।**

चौक तुपगाव येथील तेजस हनुमंत गुरव (३४) हा मनोहर लक्ष्मण कुंभार (साळवी) याचाच मुलगा आहे असे लोक चिडवत असल्याने आईशी अनैतिक संबंध असण्याच्या संशयावरुन मनोहर कुंभार याच्याबद्दल तेजसच्या मनात राग होता. त्यामुळे दि. ३ जून २०१८ रोजी मनोहर कुंभार हे तुपगावातील महेश परिट यांच्या फार्म हाऊसवर काम करण्यास गेले असताना तेजसने मनोहरचे डोके शौचालयाजवळील सिमेंट कठड्यावर आपटून त्याच्या हातातील चाकूने गळ्यावर, छातीवर, पोटावर व इतर ठिकाणी वार करुन भोसकून त्याचा खून केला. या हत्याकांडातील तेजसला दोषी धरून आजन्म कारावास आणि एक लाख रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. या खटल्याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश १, जे. डी. वडणे यांचे न्यायालयात झाली. या प्रकरणामध्ये सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, ॲड. आर.ई. येरूणकर यांनी एकूण साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

# उरणकरांची सुरक्षा रामभरोसे

## निकामी ठरलेत सीसीटीव्ही कॅमेरे

**। उरण, । वार्ताहर ।**

उरण परिसरातील अनेक मोक्याच्या ठिकाणी असलेले सीसीटीव्ही कॅमेरे मागील काही महिन्यांपासून बंद पडले आहेत. निकामी ठरलेल्या सीसीटीव्हीमुळे उरणकरांची सुरक्षा रामभरोसे उरली आहे. विविध शासकीय विभागांनी उरणमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची दिलेली आश्वासने हवेतच विरली आहेत. त्यामुळे पोलिसांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे.

जेएनपीए अंतर्गत असलेली आंतरराष्ट्रीय स्तरावरील खासगी सहा बंदरे,त्यावर आधारित उभारण्यात आलेल्या शेकडो कंटेनर यार्ड,सीएफएल, कंपन्यांमुळे उरण परिसर औद्योगिकदृष्ट्या प्रगती पथावर आहे. भविष्यात किंवा एक दोन वर्षांत या बंदरातून एक कोटी कंटेनर मालाची चढउतार होणार आहे. त्यामुळे उरण आंतरराष्ट्रीय बाजारपेठ म्हणून ओळखली जाऊ लागली आहे.त्यानंतर आता मुंबई आणि उरण तालुक्याला जोडणाऱ्या अटल सेतू आणि रेल्वे प्रवासी वाहतूक सुरू झाल्यानंतर मुंबई -उरण अंतर तर अवघ्या ६० मिनिटांवर आले आहे. या वाढत्या औद्यौगिकीकरणामुळे लोकसंख्याही वाढतच चालली आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीमध्ये देखील वाढ झाली आहे. यामध्ये हत्या आणि चोरीच्या गुन्ह्यांमध्येही वाढ झाली आहे.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांना सीसीटीव्ही कॅमेरे उपयुक्त ठरतात. मात्र उरण परिसरात ठिकठिकाणी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे अनेक महिन्यांपासून निकामी अथवा बंद पडलेले आहेत. तर रेल्वे स्थानक परिसर आणि काही मोक्याच्या ठिकाणी अद्यापही सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

उरण शहर आणि परिसरात सुमारे ८५ सीसीटीव्ही लावण्याचा प्रस्ताव पोलीसांकडून देण्यात आला होता.यासाठी ओएनजीसी आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात असल्याचे नवनियुक्त उरण वपोनि जितेंद्र मिसाळ यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले होते.तर मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे उरण नगरपरीषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांनी माहिती देताना सांगितले होते.तर उरणमधील हत्या, महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटना, बदलापूर येथील शालेय चिमुरड्यांवर झालेल्या संतापजनक घटनांनंतर अनेक राजकीय पुढारी, विविध सामाजिक संस्था यांनीही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी आग्रही मागणी केली आहे.मात्र सत्ताधारी महत्वाच्या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे.

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



निवडक

### उपचारादरम्यान रुग्णाचा मृत्यू

**पनवेल :** उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलेला एक रुग्ण उपचारादरम्यान बाथरुममध्ये गेला असता या ठिकाणी निपचित पडलेल्या अवस्थेत आढळून आला. या व्यक्तीचे नाव अजय सिंग (४५) असे असून रंग सावळा, नाक सरळ, केस काळे वाढलेले, उंची ५ फुट ५ इंच, डोक्याला अर्धवट टक्कल, चेहरा उभट, अंगात सफेद रंगाच्या उभ्या रेषांची लाल रंगाचा फुल बाह्याचा शर्ट घातलेला आहे. याबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२४४४) किंवा सहा. पोनि राजरत्न खैरणार यांच्याशी संपर्क साधावा.

### विचुंबे गावात तरुणाचा मृतदेह

**पनवेल :** विचुंबे गावातील रेल्वेपट्ट्याजवळ असलेल्या झाडाला एका सव्वीस वर्षीय तरुणाचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. त्याच्या जवळ असलेल्या आधार कार्डवरुन त्याचे नाव श्याम तुळश्या वाघे (जि. ठाणे) येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे. रेल्वे पट्ट्याजवळील झाडाला २७ ऑगस्ट रोजी एक व्यक्ती पांढऱ्या साडीच्या तुकडयाने गळफास घेतलेल्या अवस्थेत असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळाली होती. पोलिस उपनिरिक्षक दत्तात्रेय वणे पुढील तपास करत आहेत.

### हॉटेल मालकांची बैठक

**पनवेल :** आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने तालुक्यातील पळस्पे फाटा ते खारपाडा टोलनाका दरम्यान गोवा रस्त्यालगत असलेले ढाबा, हॉटेल, लॉज मालक-चालक यांची मंथन हॉल येथे बैठक घेण्यात आली. यावेळी पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, उत्सवा दरम्यान रस्त्यावर पार्किंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. याकरिता विशेष लोक नेमावेत. कोकणात जाणाऱ्या भाविकांना अपघात अथवा इतर संकट वेळी मदत करावी, प्रत्येकाने आपल्या हॉटेल समोर अद्यावत सीसीटीव्ही कॅमेरे लावून घ्यावे.

### नगरपंचायतीला निवेदन

**पाली :** गणेशोत्सव सण काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. असे असताना मात्र पाली शहरासह सुधागड तालुक्यात वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा यामुळे तालुक्यातील नागरिक हैराण झालेले आहेत. सणासुदीच्या काळात अविरत वीज पुरवठा व्हावा. त्याचप्रमाणे पाली शहरातील बल्लाळेश्वर मंदिर ते मारुती मंदिर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत हे खड्डे गणपतीच्या आधी भरण्यात यावेत, यासाठी सुधागड तालुका उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्यावतीने महावितरणचे प्रतिनिधी मोर्या यांना नुकतेच निवेदन देण्यात आले.

### फळझाडांची लागवड

**उरण :** मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याने पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होतं असते. यामुळे वृक्ष लागवडी सोबतच त्यांची जोपासना आणि त्यांचे संवर्धन करणे देखील काळाची गरज आहे. याच गोष्टीचे महत्व लक्षात घेता राष्ट्रीय सेवा योजने कार्यक्रमा अंतर्गत रिटघर येथे डी.वाय. पाटील विद्यापीठाच्या रामराव आदिक इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी नेरूळ या कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून राजिपच्या दुंदरे आणि दुंदरेपाडा या शाळांच्या आवारात तब्बल १५० फळझाडांची लागवड करण्यात आली.

# पारंगखार येथे शेकापची वचनपूर्ती

## राम मंदिरात सौरऊर्जा पॅनलचे लोकार्पण ; चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती





**। चणेरा । प्रतिनिधी ।**

**रोहा तालुक्यातील पारंगखार गावातील राम मंदिरात सौरऊर्जा पॅनलचे शेतकरी कामगार पक्षाच्या रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. चित्रलेखा पाटील यांनी पारंगखार गावातील कार्यकर्त्यांना मंदिरात सौरऊर्जा पॅनल स्वखर्चाने बसवून देण्याचे वचन दिले होते, त्याची त्यांनी वचनपूर्ती केली.**

दरम्यान, याआधी पारंगखार गावात चित्रलेखा पाटील यांच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले आहे. तसेच नेत्रचिकित्सा करुन गरीब व गरजूंना मोफत चष्मे वाटप करण्यात आले असून, गरजूंना स्वखर्चाने आर्थिक मदतदेखील करण्यात आलेली आहे. खास गणपतीसाठी गावाला येणाऱ्या चाकरमान्यांना तीन बस देण्यात आल्या आहेत. त्यानंतर महिलांसाठी महिला कार्यशाळेचे नूतनीकरण करण्याचे वचन दिले आहे. यापूर्वी दिलेल्या शब्दाची वचनपूर्ती केली असल्याने आता देलेले वचनही ताई पूर्ण करतील, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

याप्रसंगी आपल्या भाषणात चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, माझ्या वडिलांनी आणि सासऱ्यांनी मला एक गोष्ट सांगितली की, जे आपण कमवतो त्यातील २५ टक्के आपण गरीबांना दिले पाहिजे. ते मी करते, त्याचा मला आनंद आहे. मी कधी घाणेरडे राजकारण केले नाही. कारण, ते मला आवडत नाही. गावातील विकासकामे करायची असतील, तर शेकापशिवाय पर्याय नाही.

यावेळी मजदूर फेडरेशनचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन गोपीनाथ गंभे, व्हाईस चेअरमन विकास भायतांडेल, कार्यालयीन चिटणीस संदेश विचारे, कोकबन ग्रामपंचायत सदस्या अरुणा तांबडे, कृषी बाजार समिती संचालक विनायक धामणे, विलास म्हात्रे, आत्माराम कासारे, संतोष दिवकर, शंकर दिवकर, ज्येष्ठ कार्यकर्ते शंकर शाबासकर, पांडुरंग ठाकूर, रामनाथ घाग, मंगेश म्हात्रे, संतोष घाग, मनोहर गुंडे, चांगुणा गुंडे, दर्शना गायकर तसेच असंख्य कार्यकर्ते, महिला कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग तांबडे यांनी केले.

# वंजारवाडी फाटा खड्ड्यात

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वंजारवाडी फाट्यावर असलेल्या रस्त्याची अवस्था दयनीय झाली असून रस्त्यात मोठं मोठे खड्डे पडले आहेत. कर्जत तालुक्यातील शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली या महामार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक चालू असते. या ठिकाणी वाहनांची वर्दळ असल्याने खड्डेमय रत्यामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे. तसेच, राष्ट्रीय महामार्गावर अशा प्रकारे खड्डे पडून देखील संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे.

कर्जत तालुक्यातील पेज नदी पुल सोडल्यानंतर कर्जतच्या दिशेने येताना हे भयानक खड्डे अपघाताला निमंत्रण देत आहेत. जवळजवळ आठ फूट लांब आणि एक फूट खोल खड्डे पडल्याने रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते, असे चित्र पाहायला मिळत आहे. पावसाळा असल्याने हे खड्डे पूर्ण पाण्याने भरल्यावर खड्डा किती मोठा आहे, याचा अंदाज वाहन चालकाला येत नाही. यामुळे या रस्त्यावर येणारे वाहन खड्ड्यात आदळून वाहनांचे नुकसान होत आहे.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी याच ठिकाणी रोलरचे मालक महम्मद हरून या व्यक्तीचा अपघात होऊन डोक्याला मार लागल्याने पनवेल येथील एम जीएम रुग्णालयात दाखल केले होते. चार दिवस कोमात असताना त्यांचा मृत्यू झाला होता. तर, त्याच ठिकाणी कशेळे येथील शिक्षिकेचा ही अपघात होऊन हात फॅकचर झाला होता. त्यामुळे जीवघेण्या खड्डे त्वरित भरून पुढे होणारे अपघात टाळता येतील. संबंधित विभागाने या रस्त्याची त्वरित पाहणी करून खड्डेमय झालेले रस्ते भरून डागडुजी करावी आणि वाहन चालकांचा प्रवास सुखकर करावा, अशी मागणी होत आहे.



# चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते भूमीपूजन



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

**रेवदंड्यात शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांचे हस्ते भूमिपूजन तसेच शुभारंभ कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी थेरोंडा व रेवदंडा विभागातील शेकापक्षाचे कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.**

रेवदंडा वाडी मोहल्ला येथे शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या निधीतून बनविण्यात आलेल्या पेव्हर ब्लॉक रस्ताचा शुभारंभ, वरसोलकर व जयंत शिंदे यांच्या घरासमोरील रस्ताचे भूमिपूजन कार्यक्रम शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांचे हस्ते पार पडले. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी पेव्हर ब्लॉकचे फित कापून तसेच शरद वरसोलकर व जयंत शिंदे यांच्या समोरील रस्ता नुतनीकरण भुमिपुजन श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी थेरोंडा येथील तिन रस्त्याचा शुभारंभ, थेरोंडा बाजारपाड्यातील रस्ता नुतनीकरण व रेवदंडा येथील व्यायामशाळेला निधी देणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी शेकापचे रेवदंडयातील जेष्ठ कार्यकर्ते सदाशिव मोरे, सुरेश खोत, शरद वरसोलकर, मुज्जफर मुकादम, जावेद मुकादम, बाळू नवखारकर, सलिम गोंडेकर, संदिप खोत, संतोष मोरे, राजन वाडकर, खलिल तांडेल, निलेश खोत, राहूल गणपत, संतोष जाधव, राजू काटेकर, मिलिंद वाडकर, विजय चौलकर, महेश सुडकू, जयेश जंगली, सनंद सुडकू, पंढरीनाथ चौलकर,अभय ठाकूर, जयेश कोंडे, उमेश कोंडे, अजय चौलकर आदींची उपस्थिती होती. तसेच, नागाव सरपंच हर्षदा मयेकर, सरोज वरसोलकर, मनिषा चुनेकर, जयश्री पाटील आदी महिलावर्ग देखील उपस्थित होता.

# माणगावात गळफास घेऊन आत्महत्या

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगावातील एका २३ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि.३०) रात्री पवाणेबारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. माणगाव पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, माणगावातील अक्षय राजू मोहिते याने कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव माणगाव-पुणे रस्त्यालगत असलेल्या टेंबे वाडा समोरील वक्रतुंड इंटरप्रायजेस गाळ्यात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्याला उपचाराकरिता माणगावयेथील उपजिल्हा रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी त्याला मयत घोषीत केले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बेलदार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार निमकर हे करीत आहेत.

## गुटखा साठा जप्त

**पनवेल :** नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने तळोजा येथील पेंधर गावातील घरावर छापा मारुन प्रतिबंधीत असलेला ५.४० लाख रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला आणि सुगंधी तंबाखू साठा जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी गुटख्याचा साठा करुन ठेवणाऱ्यांना अटक केली आहे. सतिशसिंग नेपाळसिंग ठाकूर (३२) आणि जितेंद्र राजवुमार कामत (२१) या दोघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली आहे. आरोपींनी हा गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ कुठून आणला? याबाबत अधिक तपास करित आहेत.

# यज्ञेश उभारेचा अपघाती मृत्यू

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव पंचायत समितीचे माजी सभापती प्रभाकर उभारे यांचा मुलगा यज्ञेश उभारे याचे शुक्रवारी (दि.३०) अपघातात दुर्दैवी निधन झाले. हा अपघात मुंबई-गोवा महामार्गावर माणगावजवळील नाणोरे गावानजीक घडला आहे.



माणगाव पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आप्रोज रशीद मुजावर (२४) रा.दहिवली-कर्जत याने अशोक लेलंड कंपनीची गाडी (एमएच-४६-बियु-५९१८) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर विरुद्ध दिशेने अतिवेगाने चालवत होता. यावेळी समोरून येणारी दुचाकी (एमएच-०६-सीए-८६८७) गाडीला समोरून जबर धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार यज्ञेश उभारला गंभीर स्वरूपाच्या दुखापती होऊन त्याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आला असून आरोपी आप्रोज रशीद मुजावर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताचा अधिक तपस सहा. पोनि बेलदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि पवार हे करीत आहेत.

## गणेशमूर्तींवर अखेरचा हात फिरवण्यासाठी कारागिरांची लगबग

# रंगकामाबरोबरच डोळ्यांच्या आखणीवर नजर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**शहरासह तालुक्यातील कार्यशाळांमध्ये गणेशमूर्तींवर अखेरचा हात फिरवण्यासाठी कारागिरांची लगबग सुरू आहे. मूर्तीची रंगरंगोटी, डोळे आखणी, फेटे आणि दागिन्यांच्या सजावटीचे काम दिवस-रात्र सुरू असून अंतिम टप्प्यात आले आहे. बाप्पाचे आगमन अगदी काही दिवसांवर आल्याने शहरातील दुकाने गणेशोत्सवासाठी फुलून गेली आहेत.**



तालुक्यातील अंतोरे, दादर, जोहे, कळवे, तांबडशेत, हमरापूर, वडखळ, दादर, बोरी, शिर्की, उंबर्डे, कोप्रोली यासह शहरातील कासार आळी, गुरवआळी, फणसडोंगरी, नवीन वसाहत, कुंभारआळी, गांगळ आळी, नंदिमाल नाका, उत्कर्ष नगर येथील कारखान्यांमध्ये लाखोंच्या संख्येने गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. जीआय मानांकनामुळे यंदा गणेशमूर्तींसाठी ६० टक्के वाढीव मागणी नोंदवली गेली आहे. काही कारखानदारांकडे पुढील वर्षीसाठीही नोंदणी पूर्ण होत आली येत आहे. आतापर्यंत पेणमधील तब्बल ४० लाख गणेशमूर्ती देशभरात पोहोचल्या आहेत; तर इंग्लंड, अमेरिका, न्यूझीलंड आदी देशांत कंटेनरच्या कंटेनर रवाना झाले आहेत.

### महिला कारागिरांनाही रोजगार

**पेणमधील घराघरांत मूर्ती तयार करण्याचा व्यवसाय चालत असून महिलांचा वाटा मोठा आहे. तयार मूर्तीवर फिनिशिंगचे काम करणे, रंगरंगोटी करण्याचे काम घरातील कामे सांभाळून महिला कारागीर करतात. महिला बचत गटाच्या माध्यमातूनही मूर्ती निर्मितीचे प्रशिक्षणही दिले जाते. डोळ्यांची आखणी करण्याच्या कामात ३० टक्के महिला आहेत.**

### तालुक्यात ३० हजार मूर्ति कार्यशाळा

**पेण तालुक्यात जवळपास २५ ते ३० हजारांच्या आसपास मूर्तिकार्यशाळा आहेत. तर, दरवर्षी साधारण ५० ते ६० लाख गणेशमूर्ती साकारण्यात येतात. दोन-तीन वर्षांपासून कच्च्या मालाच्या किमतीत वाढ, अवाच्या सवा येणारे वीजबिल, व कुशल कारागिरांच्या कमतरतेमुळे गणेश मूर्तिकारांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असले तरी उत्सव जसजसा जवळ येत आहे, तशा तालुक्यातील वातावरण भक्तिमय होत असल्याचे दिसते.**





**स्पर्धेचे स्वरुप**

- आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
- स्पर्धा ८ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२४ या कालावधीत घेतली जाईल.

**फोटोसाठी स्थानिक संपर्क**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सुरेश खडपे (चौल) | ९९२१०५४६०६ | सुधीर नाझरे (मुरुड) | ९४२३३७७२४२ | मुस्कान खान (पेण) | ८९२८९११३९१ |
| जीवन पाटील(भाकरवड) | ७०६६८९८६३७/ ८१४९६६३८१३ | मदन हणमंते (मुरुड) | ९४२३३७७२३४ | राकेश खराडे (रसायनी) | ९६६५३१४११५ |
| संजय गायकवाड (कर्जत) | ९४२३३७७९०० | दत्ता म्हात्रे (चिरनेर) | ७२०८३७७१०५ | बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा) | ९८६०६०९६५४ |
| समीर मालोदे (अलिबाग) | ९४२३३७५३६१ | जुनेद तांबोळी (महाड) | ८४११९२४४६२ | भूषण सुतार (सुधागड) | ८१४९६६४०५८ |
| मुकुंद रांजणे (माथेरान) | ७५०७६७३८७९ | शैलेश पालकर (पोलादपूर) | ९२२६८४९१८५ | सत्यप्रसाद आढाव (रोहा) | ८९८३४२०१६१ |
| अनिल गवळे (वेणगाव) | ९६८९९५४४२४ | कांता हाबळे (नेरळ) | ९२०९२३८७६९ | अब्दुल सोगावकर (सोगाव) | ९९६०४८११३३ |
| नंदकुमार मरोदे (खांब) | ८३०८६८८२२९ | राजू नेवासेकर (मुरुड) | ९९२१६२३८४८/ ८२३७१३८९७४ | गणेश चोढणेकर (मुरुड) | ९२६००१६३२३ |
| सलीम शेख (माणगाव) | ९४२३३८२७८९ | सुनील ठाकूर (उरण) | ८१०८९२१५६५ | वैशाली मलबारी (पेण) | ८९८३९३६४५५ |

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906/ 9175021288

फोटो पाठविण्याची वेळ स. १०.३० ते संध्या. ५.३० वा. पर्यंत.

# माथेरान पालिकेचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान पर्यटनस्थळी येणारे पर्यटकांकडून पालिका ५० रुपये स्वच्छता कर आकारत असते. रात्र, या बदल्यात किमान स्वच्छता गृह उपलब्ध केली असून शहराच्या वेगवेगळ्या भागात असलेल्या बहुतांश स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली आहे. माथेरान शहरातील प्रेक्षणीय स्थळी असलेली स्वच्छतागृह कायम स्वच्छ राहावीत यासाठी माथेरान निसर्ग पर्यटन संस्थेकडून मागील चार वर्षे पाठपुरावा केला जात आहे. दरम्यान, माथेरान पालिकेकडून स्वच्छता गृहांची स्वच्छता केली जात नसल्याने माथेरान निसर्ग पर्यटन संस्था उपोषण करणार आहेत.

माथेरान शहरातील प्रेक्षणीय स्थळ असलेल्या ठिकाणी पर्यटकांच्या सोयीसाठी स्वच्छता गृह उभारण्यात आली आहेत.

माथेरान पालिका शहरात येणारी पर्यटकांकडून ५० रुपये स्वच्छता कर आकारत असते. अशावेळी पर्यटकांसाठी असलेली स्वच्छता गृह स्वच्छ असावीत अशी साधी अपेक्षा आहे. पॉईंटवर असलेली स्वच्छतागृह वगळता अन्य कोणत्याही सुविधा माथेरान पालिका पर्यटकांना पुरवत नाही. त्यामुळे स्वच्छतागृह सुस्थितीत असतील अशी अपेक्षा आहे. परंतु, प्रेक्षणीय स्थळी असलेली बहुतांश स्वच्छतागृह अस्वच्छ आहेत. पॉईंटवरील नादुरुस्त स्वच्छतागृह लवकरात लवकर व्यवस्थित करून घेण्यात यावी अशी मागणी माथेरान निसर्ग पर्यटन स्टॉल संघटना यांनी केली आहे.

सतत चार महिने पाठपुरावा करून देखील पालिका पर्यटकांच्या सेवेसाठी उभारलेली स्वच्छतागृह सुस्थितीत ठेवण्याची कार्यवाही करताना दिसत नाही. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात निसर्ग पर्यटन स्टॉल संघटनेचे अध्यक्ष संतोष कदम हे शहरातील श्रीराम चौकात उपोषण करणार आहेत, असा इशारा देणारे पत्रा माथेरान पालिकेला दिले आहे.

# ध्येय गाठण्यासाठी जिद्द महत्वाची: राकेश पाटील



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

जीवनात यश मिळावावचे असेल तर प्रत्येकांनी अथक परिश्रम घेऊन यश प्राप्त करावे. गुणवत्तेची कास धरावी, जेणेकरून जीवनात आपल्याला उचित ध्येय गाठता येते. आपले आयुष्य जगत असताना नेहमी दुसऱ्याचा आदर करावा, जेणेकरुन भविष्यात आपण देखील मोठे अधिकारी बनु शकता. यासाठी जिद्द, श्रम व कसोटी महत्वाची असल्याचे प्रतिपादन कामगार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष राकेश पाटील यांनी मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा दालनात पदोन्नती शुभेच्छा कार्यक्रमावेळी बोलत होते.

मुरूड-जंजिरा नगरपरिषदेचे लिपिक मनोज पुलेकर यांना आरोग्य निरीक्षक ही पदोन्नती प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषदेच्या कामगार संघटनेच्यावतीने गौरवण्यात आले. यावेळी मुरुड-जंजिरा नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी-परेश कुंभार, मनोज पुलेकर, नंदकुमार आंबेतकर, सतिश जंजिरकर, मंगेश गुरव, ओंकार पोतदार, जयेश चोडणेकर, रुपेश भाटकर, मितेश माळी, संदिप कमाने, नगरपरिषदेचे कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद केलेली मिळकत ही आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुधाकर अर्जुन ठाकूर मु.आंबेघर पेझारी यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शहापूर, ता. अलिबाग | ५६८/४ | ०-४०-०० | ४.६९ |

दिनांक :- ३१/०८/२०२४

सही/-
अशिलांतर्फे वकील
**अ‍ॅड. हर्षल पाटील**

# गणरायाचे आगमन काही दिवसांवर

## शेवटचा हात फिरविण्यात मूर्तिकार व्यस्त





**। धाटाव । वार्ताहर ।**

श्रावण महिना संपत आला असून गणरायाचे आगमन काही दिवसांवर आले आहे. या सणानिमित्त मुंबई, पुणे, कोल्हापूर सारख्या महानगरात मोठ्या उत्साहात सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो. पण तळकोकणातील या सणाची नजाकत काही वेगळीच असून बाप्पाचे आगमन म्हणजे लहान थोरांचा श्रध्देचा विषय आहे. एका वर्षाने बाप्पा आपल्या घरी येणार असल्याने महिला वर्ग घरातील साफसफाईच्या कामात व्यस्त आहेत.

मखर सजविण्यापासून गणरायाच्या स्वागतासाठी स्वागत कमानी उभारण्यावर बच्चे कंपनीने भर दिला आहे. रोह्यात सध्या बाप्पांची मूर्ती साकारणाऱ्या कला केंद्रांमध्ये बाप्पांच्या मूर्त्यांवर शेवटची रंगरंगोटी करण्याचे कामही जोमात सुरू असल्याचे पहायला मिळत आहे.

रोहा शहरासह ग्रामीण भागातून विविध कलाकेंद्रात सध्या गणेश मूर्तींवर शेवटचा हात फिरवला जात आहे. वरसे विभागात धाटावमध्ये यशवंत रटाटे, यदुराम रटाटे यांच्या नारायण कला केंद्र, किल्ला गावात वागळेकर यांचे अश्विनी कला केंद्र, तळाघर गावातील संदेश मोरे यांचे वरदविनायक कला केंद्र तर मनोज कळंबे यासह रोठ्खुर्द गावात मुकुंद मोरे यांचे पांडुरंग कला केंद्र आणि वरसे गावातील संदीप मेस्त्री यांच्या गणेश कला मंदिरात मूर्त्यांवर रंगाचा, हिऱ्यांचा साज चढविला जात आहे. मागील तीन पिढ्यांपासून बाप्पांच्या मूर्त्या साकारण्याचे काम या कला केंद्रातून होत असून ग्रामीण भागातील नागरिकांना परवडतील इतक्या रास्त किंमतीत या कला केंद्रात मूर्त्या बनविल्या जातात. केंद्रात तयार करण्यात येणाऱ्या आकर्षक गणेश मूर्तींमुळे या सर्वच केंद्रातील मूर्त्यांना ग्रामीण भागातून मोठी मागणी आहे.

रोह्यासह विभागातील कला केंद्रात तयार होणाऱ्या बाप्पांच्या सुबक आणि आकर्षक मूर्त्यांवर बारीक रेखीव काम करणारी मंडळी मागील तीन पिढ्यांपासून कार्यात आहेत. या कलाकेंद्रांमुळे तरुणांमध्ये मोठा उत्साह असल्याचे पहायला मिळत आहे. तर, बारीक रंगरंगोटी, हिरे व आकर्षक कपड्यांची सुबक आणि रेखीवकामे करण्याची जबाबदारी येथील मूर्तिकारांच्या कुटुंबातील महिला वर्गावर आहे.

## मागणीप्रमाणे मूर्त्यांची प्रतिकृती

**ग्राहकांच्या मागणीप्रमाणे येथील मूर्त्यांची प्रतिकृती येथे साकारली जात असून लालबागचा राजा, दगडूशेठ हलवाई, कोळीवाड्याचा राजा, टिटवाळ्याचा गणपती तसेच इतर अनेक प्रकारच्या आणि विविध वेशभूषा असलेल्या आकर्षक मूर्त्या याठिकाणी बनवून रंगांचा साज चढविला जात आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शाडूच्या मातीचे दर आणि वाहतूक तसेच रंगाचे भाव वधारल्याने महागाईची झळ बसत असून गणेशमूर्त्यांचेही भाव वाढलेले आहेत.**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहीला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१**
Email ID : aresalibag@gmail.com

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,**

जा.क्र ५/८
अर्ज क्रमांक ६४/२०२४
दिनांक- २३/०८/२०२४

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक - अर्जदार

विरुद्ध

१. सौ. स्नेहा सचीन पाटील
पत्ता :-मु. चरी - कोलटेंभी पो- पोयनाड ता. अलिबाग जि. रायगड
२. श्री सचीन जगन्नाथ पाटील
पत्ता :- मु. चरी - कोलटेंभी पो- पोयनाड ता. अलिबाग जि. रायगड
३. श्री. विकास रघुनाथ पाटील
पत्ता :- रायंदे पो. पोयनाड ता. अलीबाग रायगड
४. श्री अमीत प्रदीप ठाकुर
पत्ता :- मु. पो. हाशीवरे ठाकुर आळी ता. अलीबाग जि. रायगड प्रतिवादी

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु ४,५२,५८८/-साठीचा अर्ज.

ज्या अर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक, यांनी दिनांक ३०/०७/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये ४,५२,५८८/ (अक्षरी रुपये चार लाख बावन्न हजार पाचशे आठ्यानशी मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक ३१/०७/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना बजाविली गेली परंतु ती त्यांनी स्वीकारली नाही. त्यांमुळे अर्जदाराने जाहीर नोटिस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक १९/०९/२०२४ रोजी दिवसाचे दुपारी ३.०० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत,पहीला मजला, ब्राह्मण आळी.पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहीलेस किंवा बचाव करणेचा अर्ज /शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २९/०८/२०२४

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे. बारशिव, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत जमिनीचे विद्यमान मालक श्री. प्रकाश शिवराम वाजे व इतर ४ यांचेकडून कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भोगवटा धारक | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे बारशिव. ता. मुरूड, | श्री. प्रकाश शिवराम वाजे व इतर ४ | १६७ | ०-४६-००<br>पो.ख. ०-१५-००<br>एकूण ०-६१-०० | ०.५९ |

वर वर्णन केलेली संपुर्ण जमिन मिळकत ०-६१-०० हे. आर. इतके क्षेत्र कायम खरेदी विक्री करण्याबाबतचा सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री. प्रकाश शिवराम वाजे व इतर ४ यांच्या हिश्याची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्याक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन चार्च, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून दयाव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक ३१/०८/२०२४

सही/-
**अ‍ॅड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९२७२६२०००५


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

## १ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
## दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


वादी तर्फे वकील आर.बी.कोसमकर
नि. ४४

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात. जिल्हा रायगड.**

रेग्युलर दिवाणी मुकदमा क्र. : १४३/२०२१

रामनाथ ग्रामस्थ तर्फे
श्री. विलास मोरेश्वर उकरुळकर ...वादी

विरूध्द

मे.ए.टी.सी. टेलिफोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ... प्रतिवादी

या जाहीर नोटीसने तमाम लोकांस कळविण्यात येते की, वादी यांनी वर नमुद रेग्युलर दिवाणी मुकदमा हा, मे.ए.टी.सी. टेलिफोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. वगैरे यांच्या विरुध्द दाखल केला आहे. मौजे वरसोली येथील सर्व्हे नं. ६२, हिस्सा नं. ५, क्षेत्र ०-०९-६० हे.आर. या मिळकतीच्या अलिबाग वरसोली रस्त्याला लागून जोशी यांचे भातगिरणी समोर ३०X३० चौ. फुट लांबी रुंदीच्या क्षेत्रावर प्रतिवादी क्र. १ मे. ए.टी.सी. टेलिफोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हे टॉवरचे बांधकाम करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे मे. ए.टी.सी. टेलिफोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हे सदर मिळकतीत त्याचे एजंट, नोकरचाकर, असायनीज यांचेमार्फत टॉवरचे बांधकाम करु नये म्हणून वादी यांनी सदरचा दावा हा निरंतर मनाई हुकूमाकरीता वर नमुद कोर्टात दावा दाखल केलेला आहे. सदरकामी वादी यांनी सि. पी. सी. ऑर्डर १ रुल ८ प्रमाणे प्रातिनिधीक स्वरुपाचा दावा दाखल करण्याची परवानगी घेतलेली आहे.

तरी इच्छूक ग्रामस्थांनी सदर दाव्याचेकामी हजर होण्याचे असल्यास त्यांनी सदर दाव्यातील पक्षकारांमध्ये सामील होण्यासाठी वर नमुद कोर्टात दि.३०/०९/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर राहून आपले म्हणणे मांडावे. सबब ही जाहीर नोटीस

सदरची नोटीस आज दिनांक ३१/०८/२०२४ रोजी आमच्या सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड**

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड.**

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये लालचंद गंगाधर पाटील (यापुढे 'मालक' असे उल्लेखित) यांचे मालकी हक्क तपासत आहोत, जसे आमचे अशील हे मालकाकडून सदर मालमत्ता खरेदीसाठी इच्छुक आहेत.

कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दाबा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - कोपर, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित जमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र ( हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | ७७/२ | ००-४४-६० |
| २ | ७६ | ००-११-४० |
| ३ | ७८ | ०१-६०-०० पैकी ००-२३-०० |
| ४ | ७९/२ | ००-४५-४० पैकी ००-२४-२० |

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ३०/०८/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**अ‍ॅड.विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री. जनार्दन गोविंद पवार, श्री. हरिश्चंद्र गोविंद पवार, कविता काशिनाथ शिंदे सर्व रा. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे. खालील वर्णन केलेल्या मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | मालकाचे नांव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड. | श्री. जनार्दन गोविंद पवार, श्री. हरिश्चंद्र गोविंद पवार, कविता काशिनाथ शिंदे | ३६ | ०.०३.५० | ०.४१ |
| कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड. | श्री. जनार्दन गोविंद पवार, श्री. हरिश्चंद्र गोविंद पवार, कविता काशिनाथ शिंदे, | ३८ | ०.६६.६०<br>०.०४.२०<br>०.७०.८० | ११.४१ |
| कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड. | श्री. जनार्दन गोविंद पवार, | ३९ | ०.११.९०<br>०.०१.५०<br>०.१३.४० | २.७५ |

तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, बयाणापावती, लीन, चार्ज, बक्षीस, मृत्यूपत्रांकीत दान वगैरे असल्यास अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती संबंधीच्या लेखी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. ३०/०८/२०२४.

सही/-
**अ‍ॅड. संपदा मनोज पाटील**
शॉप नं. ११, भास्कर को. ऑप. हौसि. सोसा.,
रामनाथ रोड, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९२२५५६६०४३.

## जाहीर नाटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलनी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे...

**मिळकतीचे वर्णन**

मालकाचे नाव : १)अनिष आनंद जाधव, २) गिता उदय काळबेरे
रा. मु. उमरोली ता. माणगांव जि. रायगड

| मौजे | गट. नं | भो.ग.वर्ग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| उमरोली तर्फे दिवाळी | २०४ | २ | ०.६५.००<br>०.१५.००<br>०.८०.०० | ०.१६ |

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसा, हक्क, लिज, चाज, पोटगी, वहिवाट, (जाण्या-येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्यासहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील. व मागाहुन कोणाचीही तक्रार हरकत राहील्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

माणगांव
दिनांक :- २८/०८/२०२४

सही/-
**(अ‍ॅड.पी.एम.जाधव)**
Adv. P. M. Jadhav.
B.Com. LL.B.
At- Indapur, Tal. Mangaon
Dist- Raigad.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुबोध चंद्रकांत हळदणकर व माधुरी मोहन कोचरेकर दोघे रा.आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या खुद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| टेकाळी ता. अलिबाग | ७६ | -<br>पो.ख.<br>एकूण | १- ९७-२०<br>०-७६-३०<br>२-७३-५० | ३१.८० |

वर नमूद मिळकतीपैकी श्री. सुबोध चंद्रकांत हळदणकर व माधुरी मोहन कोचरेकर यांच्या मालकीहक्कात क्षेत्र ०-४५-२० हे.आर., पो.ख. ०-१५-०६ हे.आर., एकूण ०-६०-२६ हे.आर., आकार रु. ७.१९ पैसे इतके क्षेत्र असून त्या क्षेत्रापैकी ०-२४-०० हे.आर. क्षेत्र माझे अशिल यांनी दि.१५/११/२०२१ रोजीच्या साठेकराराने विकत घेतलेली आहे. तसा साठेकरार उभयतांत स्वाक्षरीत झालेला आहे. तरी सदरहू मिळकती संदर्भात कोणीही कुठल्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करु नये. त्यास आमचे अशिल यांची सक्त हरकत आहे. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १/०९/२०२४

सही / -
**अ‍ॅड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता व्यक्ती पाहिजे. संपर्क-९७६२७७७९७५.

■ व्यावसायिक गाळा भाड्याने देणे आहे कारपेट एरिया 750 Sq Foot संपर्क ९४२२५९४०३३/८३०८३२१६२६ ठिकाण - मिरची गल्ली अलिबाग.

■ Tata Heritage motors pvt. Ltd. (Alibag Showroom) Vaccancy for Below mention position 1) Sales manager-1, 2) Service manager-1, 3) Team Leader-1, 4) Custmor Adviser-5.
Email- hr@heritagemotors.in
Contact No. 9324517224

■ पाहिजेत- पाण्याचे पंप दुरुस्त करणारे मेकॅनिक पाहिजेत. तसेच हेल्पर व शिकाऊ उमेदवार पाहिजेत.बाहेरगावच्या व्यक्तींसाठी राहण्याची सोय उपलब्ध. त्वरीत भेटा. मे. हजारे एन्टरप्रायजेस, अलिबाग-रायगड. ९८२२००१८५३.

■ ऑनलाईन प्रवेश सुरु आहे. अंगणवाडी शिक्षिका, सुपरवाझर, समाजसेवक, पत्रकार इत्यादी कोर्स प्रवेश देणे सुरु आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा ९०२९२९४८३८/९५१८५६५५१६

■ कॅन्टीनसाठी अनुभवी सुपरवायजर पाहिजे. अलिबाग येथे कॅन्टीनमध्ये राहणारा पाहिजे. संपर्क : ९२२४४४९९४१ वायोडाटा व्हाटस्अप वर पाठवणे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### १ सप्टेंबर

१) श्री. विजय तुकाराम चव्हाण श्रीबाग-२, दि.१-९-१९४८
२)श्री.प्रभाकर मोतीराम धनावडे रायवाडी अलिबाग, दि.१-९-१९३७
३)श्रीम.मालती प्रभाकर बोंद्रे, नांदे-वरसोली, अलिबाग दि.१-९-१९४०
४)श्री.अभिमन्यू नारायण कोळी नवेदर-नवगाव, दि.१-९-१९५०
५)श्रीम.देवकु अभिमन्यू कोळी नवेदर-नवगाव, दि.१-९-१९४९
६)श्रीम.शरयू सुरेश गुरव चाळमळा, अलिबाग दि. १-९-१९५५
७)श्री.हरिश्चंद्र शांताराम ठाकूर चाळमळा, अलिबाग दि.१-९-१९५४
८)श्री.बाळासाहेब सदाशिव बनसोडे ठिकरूळनाका, अलिबाग दि.१-९-१९५७
९)श्री.अनिल हरिश्चंद्र थळे वाडगाव, अलिबाग दि.१-९-१९५९

# तळ्याचा कारभार प्रभारींच्या हाती

## शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर होतोय परिणाम

**। तळा । वार्ताहर ।**

### महत्त्वाच्या खात्याची पदे रिक्त

**तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयांना रिक्त पदांनी ग्रासले आहे. त्यामुळे तालुक्याच्या विकासाला खीळ बसली आहे. पंचायत समिती, तहसील कार्यालय, नगरपंचायत कार्यालयात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असून, ती अद्याप भरण्यात न आल्याने विकास खुंटला आहे. तळा तालुक्यातील बहुतांश अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरवशावर प्रशासन चालविले जात आहे. महसूल, कृषी खाते, प्राथमिक आरोग्य केंद्र या महत्त्वाच्या कार्यालयातदेखील अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत आहे.**

रायगड जिल्ह्यातील दुर्गम व मागासलेला म्हणून तळा तालुक्याची दरबारी नोंद आहे. तालुक्याच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी तहसील कार्यालय, पंचायत समितीची असते. मात्र, प्रदीर्घ कालावधीनंतरही अजूनही तालुक्याचा विकास हवा तसा होऊ शकला नाही, ही शोकांतिका आहे. तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयांना रिक्त पदांनी ग्रासले आहे. त्यामुळे तालुक्याच्या विकासाला खीळ बसली आहे. पंचायत समिती, तहसील कार्यालय, नगरपंचायत कार्यालयात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असून, ती अद्याप भरण्यात न आल्याने विकास खुंटला आहे. तळा तालुक्यातील बहुतांश अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरवशावर प्रशासन चालविले जात आहे. त्यातच निम्म्याहून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने तालुक्याचा विकास रखडला आहे.

तालुकास्तरावर गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी, महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी, शाखा अभियंता ही पदे अत्यंत महत्त्वाची मानली जातात. तालुक्याच्या विकासाबाबत निर्णय घेऊन प्रशासकीय यंत्रणा राबविण्याचे महत्त्वाचे काम या अधिकाऱ्यांमार्फत केले जाते. मात्र, ही सर्व पदे रिक्त आहेत. या सर्व पदांवर कनिष्ठ अधिकाऱ्यांना बसविण्यात आले आहे किंवा दुसऱ्या तालुक्यातील अधिकाऱ्यांकडे कार्यभार सोपविण्यात आले आहेत. निसर्ग सौंदर्याने आणि जंगलाने व्यापलेला हा तालुका शिक्षण, आरोग्य, वीज, रस्ते, स्वच्छ पाणी या मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहे. काही गावांपर्यंत अजूनही रस्ते पोहोचले नाहीत. निवडणुकीच्या वेळी आश्वासन देणारे लोकप्रतिनिधी पाच वर्षे गायब होतात. त्यामुळे जनतेचा लोकप्रतिनिधींवरचाही विश्वास उडाला आहे. पंचायत समिती गटविकास अधिकारी श्री. परदेशी आणि श्री. यादव यांची कारकीर्द सोडली, तर या पदासाठी आजपर्यंत नियमित अधिकारी लाभला नाही.

ग्रामीण रुग्णालय बांधून आज दोन वर्षांचा कालावधी लोटला, परंतु या रुग्णालयातील सर्वच अधिकारी कर्मचारी यांची पदे अजून भरलेली नाहीत. महसूल, कृषी खाते, प्राथमिक आरोग्य केंद्र या महत्त्वाच्या कार्यालयातदेखील अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत आहे. आपला कृषीप्रधान देश आहे. मात्र, शेतकरी वर्गाच्या सोयी-सुविधांसाठी असलेल्या प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांच्या कामाचा खोळंबा होत असल्याचे दिसून येत आहे.

# गवत विक्रीतून रोजगाराचा प्रश्न मार्गी

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**



सध्या सर्वत्र शेतीची कामे पूर्ण झाल्यामुळे आदिवासी बांधवांच्या हाताला कोठेच काम मिळेनासे होत असल्यामुळे पावसाळ्यात निर्माण झालेले गवत आदिवासींना रोजगार मिळून देत आहे. ग्रामीण भागात शेतजमिनीशिवाय बराचसा भाग ओसाड असतो. याच ओसाड जमिनीवर उगवणारे गवत कापून ते विक्री करीत असल्याचे चित्र सध्या तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात तयार होणाऱ्या गवतामुळे आदिवासींचा रोजगाराचा प्रश्न सुटत असतो. सध्या गवताला मोठी मागणी असल्यामुळे रस्त्याच्या बाजूला निर्माण झालेले गवत आदिवासी कापून त्याची विक्री करीत आहेत. शहरातील मोठे तबेलेवाले व इतर व्यक्ती मोठ्या प्रमाणात गवताची खरेदी करत असून, यातून त्यांचा उदरनिर्वाह होत आहे, असे मत आदिवासी बांधवांनी व्यक्त केले.

# नगरपरिषदेचे अधिकारी बेमुदत संपावर

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेच्या वतीने नगरपरिषद, नगरपंचायतीमधील अधिकाऱ्यांच्या विविध मागण्यांकरिता बेमुदत संप पुकारला असून, त्याच अनुषंगाने मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे अधिकारी नगरपरिषद कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, सहाय्यक कर निरीक्षक नंद कुमार आबंतेकर, लेखापाल कपिल वेहेले, आरोग्य निरीक्षक राकेश पाटील यांनी नगरपरिषद कार्यालयातील प्रांगणात आपल्या विविध मागण्यांचा बॅनर हातात घेऊन बेमुदत संप पुकारला. त्याला नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**कै. सौ. सुजाता सुधाकर गिजम, स्मरणार्थ अलिबाग**

# लहान भावाने केला मोठ्या भावावर हल्ला

**। पनवेल । वार्ताहर ।**

यापूर्वी झालेला भांडणाचा राग मनात धरून लहान भावाने मोठ्या भावाला लोखंडी रॉडने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी कृष्ण भगवान साळवी (३६, रा. आझाद नगर झोपडपट्टी, पनवेल, रेल्वे रोड) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रदीप भगवान साळवी यांचा भाऊ कृष्ण भगवान साळवी यांनी प्रदीपसोबत यापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून त्यांना ठार मारण्याच्या उद्देशाने २७ ऑगस्ट रोजी घराचा दरवाजा आतमधन लावून घेतला आणि घरामध्ये असलेल्या लोखंडी रॉडने प्रदीप यांच्या डोक्यात आणि दोन्ही हातावर मारहाण केली. यात त्यांच्या डोक्याचे हाड आणि डाव्या हाताचे बोट फ्रॅक्चर झाले. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पोलिसांनी कृष्ण साळवी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

# बेमुदत संप ४ सप्टेंबरपर्यंत स्थगित

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रातील सरकारी निमसरकारी कर्मचारी व शिक्षक समन्वय समितीने सर्वांना पेन्शन मिळावी व इतर मागण्यांसाठी गुरुवारी (दि. २९) बेमुदत संप पुकारला होता. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या आवाहनामुळे बुधवार (दि. ४) पर्यंत स्थगित करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संघटना पदाधिकारी यांच्याशी प्रलंबित मागण्यांबाबत मंगळवारी (दि.२७) चर्चा केली. ते म्हणाले की, राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात पटलावर ठेवल्यानुसारच सुधारीत निवृत्तीवेतन योजना राबविली जाईल, असे अभिवचन देऊन इतर विषयांबाबत निर्णायक चर्चा व्यस्ततेमुळे दोन ते तीन दिवसांनंतर संपन्न होईल, असे स्पष्ट केले. या बैठकीला राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना अध्यक्ष अशोक दगडे, समन्वय समिती निमंत्रक विश्वास काटकर, राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष ग.दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, कर्मचारी संघटनेचे कोषाध्यक्ष गणेश देशमुख, सुधाकर सुर्वे, सुरेंद्र सरतापे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

या अनुषंगाने समन्वय समितीची विस्तृत ऑनलाईन सभा अशोक दगडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. समन्वय समितीच्या सभेत मुख्यमंत्री शिंदे यांनी विनंती केल्यानुसार अपेक्षित निर्णय घेण्यासाठी काही दिवसांचा कालावधी देणे योग्य होईल, असा ठराव मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे दि. २९ ऑगस्टपासून नियोजित संपाची बदललेली पुढील तारीख ४ सप्टेंबर रोजी समन्वय समितीची विस्तारीत सभा घेऊन ठरविण्यात येईल, असा निर्णय झालेला असल्याने तूर्तास संप स्थगित करण्यात आलेला आहे, असे बैठकीत सांगण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील समन्वय समितीच्या सर्व घटक संघटनांनी संपाची पूर्वतयारीकरिता मेहनत घेतली तसेच सर्वांनी संघटनात्मक ऐक्य दाखविले त्याबद्दल सर्व संघटना पदाधिकारी तसेच जिल्ह्यातील कर्मचारी व शिक्षक यांचे समन्वय समितीतर्फे अध्यक्ष सुरेश पालकर, निमंत्रक प्रभाकर नाईक, कार्याध्यक्ष कैलास चौलकर व कर्मचारी संघटना अध्यक्ष संदीप नागे यांनी जाहीर आभार व्यक्त केले.

# प्रा. प्रशांत म्हात्रे यांना पितृशोक

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

कडापे येथील मारुती नाग्या म्हात्रे (६६) यांचे रविवारी (दि. २५) प्रदीर्घ आजाराने निधन झाले. प्रा. प्रशांत म्हात्रे यांचे ते पिताश्री होते. त्यांच्या अंत्ययात्रेला विविध क्षेत्रातील



नागरिक उपस्थित होते. एकेकाळी समुद्रात बुडी मारून रेती काढून, आपल्या कुटुंबाची उपजीविका चालविणाऱ्या मारुती म्हात्रे यांनी आपल्या मुलांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. त्यांचा एक मुलगा प्रशांत म्हात्रे हा प्राध्यापक आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार, दि. ३ सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र वशेणी खाडी येथे सकाळी आठ वाजता, तर उत्तरकार्य विधी गुरुवार, दि. ५ सप्टेंबर रोजी कडापे येथील राहत्या घरी होणार आहेत.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ०१ ते ०७ सप्टेंबर २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### प्रयत्नांना यश मिळेल

**मेष :** या सप्ताहात बौद्धिक क्षमता विकसित करण्यासाठी आपल्याला आपल्या शरीरावरही लक्ष देणे आवश्यक आहे. आपण जितके शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असाल, तितकेच मानसिकदृष्ट्या आपण तंदुरुस्त असाल. आपल्या प्रयत्नांना नवीन गती देईल आणि आपण शिक्षण, व्यवसाय इत्यादी क्षेत्रात चांगली कामगिरी करू शकता. आपल्याला आपल्या स्वभावाकडे थोडे लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्या स्वभावात चिडचिडेपणा दिसून येऊ शकतो. आठवड्याच्या शेवटी ही वेळ आपल्यासाठी चांगली असेल. आपण आपल्या प्रयत्नांच्या जोरावर यश मिळविण्यास सक्षम असाल. या राशीचे जे लोक नोकरी करत आहे, त्यांना कार्यक्षेत्रात चांगले परिणाम मिळतील. यावेळी आपले शत्रू आपले मित्रदेखील बनू शकतात. कारण यावेळी आपला व्यवहार सर्वांसोबत खूप चांगले असेल. **महिलांना :** एखादे चांगले बक्षीस मिळणार आहे. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः बाहेरील खाणे टाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. **शुभ दिनांक -**२,३

### घरातील वातावरण आनंदाचे

**वृषभ :** या आठवड्याच्या सुरुवातीला घरात आपण लक्ष द्याल, त्यामुळे सुख साधनांमध्ये वृद्धी होईल. नवीन घर खरेदी करण्याबद्दल किंवा घराचे नूतनीकरण करण्याबद्दल आपण विचार करू शकता. अचानक यावेळी आपल्याला आईच्या आरोग्याबद्दल काळजी वाटू शकते, म्हणून त्यांची काळजी घ्या. जर त्यांना अगदी लहान जरी समस्या उद्‌भवली, तरी त्यांना ताबडतोब एका चांगल्या डॉक्टरकडे घेऊन जा. यावर उपाय म्हणजे बहीण किंवा आत्या यांना भेटवस्तू द्या. आठवड्याच्या मध्यला आपल्या संतानसाठी शिक्षण क्षेत्रात चांगले प्रदर्शन करू शकते, ज्यामुळे घराचे वातावरण आणि घरामध्ये सकारात्मकतादेखील येऊ शकते. प्रेमाशी निगडित बाबींबद्दल सावधगिरी बाळगा. आपण किवा आपले संतान स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतील तर त्यांनी मैत्रीच्या समस्येपासून दूर राहून अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. **महिलांना :** त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ०५,०६

### कार्यक्षेत्रात चांगले फळ

**मिथुन :** या आठवड्याच्या मध्यला चंद्राचा संक्रमण आपल्या विरोधकांवर वर्चस्व गाजवेल, जे आपल्याला कार्यक्षेत्रात चांगले फळ देईल. कोर्ट-कचेरीच्या बाबतीतही या राशीच्या लोकांना यश मिळू शकेल. या आठवड्याच्या शेवटी आपली स्पर्धात्मक क्षमता वाढेल, ज्यामुळे आयुष्यातील मोठ्यात मोठे अडथळे दूर केले जाऊ शकतात. या राशीतील काही लोक या कालावधीत कर्जाची परतफेड करण्यास सक्षम असतील. आठवड्याच्या अखेरीस कौटुंबिक जीवनात सुसंगतता साधता येणार आहे. जर एखाद्या सदस्याशी आपला संबंधात नाराजी असेल, तर ती या काळातदेखील दूर होऊ शकते. त्याचप्रमाणे जीवनसाथीच्या कुटुंबातील सदस्यांसोबत भेट होण्याचीही शक्यता आहे. या काळात आपण अत्यंत महत्त्वाकांक्षी होऊ शकता आणि जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी कठोर परिश्रम करू शकता. प्रेम प्रकरणांसाठीदेखील वेळ चांगला आहे. **महिलांना :** कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. कुटुंबाकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. प्रकृती ठणठणीत राहील, विशेषतः प्रिय व्यक्तीला व्यसनांपासून दूर ठेवण्यास मदत करा. **शुभ दिनांक :** ३, ७.

### नोकरदारांना दिलासा

**कर्क :** या आठवड्यात हा कालावधी आपल्यासाठी खूप चांगला असल्याचे म्हणता येणार नाही. तुम्ही तुमच्या आरोग्याबाबत सावधगिरी बाळगली पाहिजे. त्याचप्रमाणे आपण आर्थिकदृष्ट्यादेखील कमकुवत होऊ शकता, म्हणून यावेळी अधिकाधिक पैशाची बचत करा. या आठवड्यात जेव्हा तुमची बौद्धिक क्षमता विकसित होईल, जेणेकरून या राशीच्या लोकांना शिक्षणाच्या क्षेत्रात शुभ परिणाम मिळतील. उच्च शिक्षण घेत असलेल्या या राशीच्या लोकांना त्यांच्या आवडीच्या शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळू शकतो. यासह आपण आपल्या कलाकौशल्यासह लोकांवरदेखील प्रभाव टाकू शकता. तथापि, या राशीच्या जातकांना, ज्यांना मुलं आहेत, त्यांनी मुलांप्रति अत्यधिक भावुक होण्यापेक्षा प्रॅक्टिकल असले पाहिजे आणि त्यांना सुधारण्यासाठी त्यांच्याबरोबर वेळ घालवला पाहिजे, तरच त्याचा परिणाम दिसेल. **महिलांना :** आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. राजकीय क्षेत्रात यश संभवते. कडक उपवास न करता हलके अन्न घेणे हितावाह आहे. जुना आजार बळवण्याची शक्यता राहील. **शुभ दिनांक :** ०४,०५.

### जोडीदाराला विश्वासात घ्या

**सिंह :** या सप्ताहातील ग्रहमान आपल्या विवाहित जीवनात ग्रहांचे संक्रमण आपल्या आयुष्यात खूप अडचणी आणू शकते. भागीदारीच्या व्यवसायात असलेल्या व्यावसायिकांना काही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. जोडीदाराची कोणतीही गोष्ट आपणास वाईट वाटू शकते आणि आपल्या दोघांमध्ये विभक्त होण्याची परिस्थिती उद्‌भवू शकते, म्हणून सावधगिरी बाळगा. आपण आपल्या कार्यक्षेत्रात चढ-उतार पाहू शकता. यावेळी घाईत कोणताही निर्णय घेऊ नका. भागीदारीमध्ये व्यवसाय करीत असल्यास आपल्या गोष्टी स्पष्ट करा आणि आपल्या जोडीदाराच्या गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न करा. आठवड्याच्या शेवटी या राशीचे लोक आध्यात्मिक गोष्टींमध्ये रस घेऊ शकतात. आपल्याला या वेळी लोकांना जास्त भेटण्याची इच्छा नसेल आणि एकाकीपणामध्ये वेळ घालवायला आवडेल. **महिलांना :** त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. चांगली ऑफर मिळेल, काम करण्याची मनीषा असणाऱ्याना चांगली ऑफर येईल. बाहेरील पाणी पिताना दक्षता पाळा, उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. **शुभ दिनांक -** ०१,०४

### गुरुजनांची साथ लाभेल

**कन्या :** या सप्ताहातील ग्रहमान आपल्या बाजूने असेल ज्यामुळे मोठी उपलब्धी तुम्ही तुमच्या जीवनात मिळवू शकतात. विद्यार्थी असतील तर आपल्या ज्ञानाने आपले सहपाठी प्रभावित होतील. गुरुजनांची ही तुम्हाला पूर्ण साथ प्राप्त होईल. या काळात एक महत्त्वाचे कुठलेही शेती जमीनविषयक काम मात्र करू नका. आपल्या रचनात्मकतेमध्ये वृद्धी होईल. करिअरला उत्तम दिशा देण्यासाठी तुम्ही दृढ संकल्पित असाल आणि यासाठी खूप मेहनत कराल. आठवड्याच्या सुरुवातीचा कालावधी आपल्यासाठी अत्यंत शुभ ठरू शकते. या काळात आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यामध्ये सकारात्मक बदल दिसून येतील. जर आपण एखाद्या दीर्घ कालीन आजाराने त्रस्त असाल, तर ते दूरदेखील होऊ शकते. आपल्या कार्यक्षेत्रातही चांगले फळ तुम्हाला मिळेल. तथापि, विरोधकांपासून सावध राहा. **महिलांना :** दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत जास्त चिंता नको. विशेषतः खाण्यापिण्याची आपली हौसमौज होणार आहे. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ०२,०७.

### भाग्याची साथ मिळेल

**तुळ :** या सप्ताहात तुम्हाला आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. या काळात तुम्हाला आपल्या शरीराला फीट ठेवण्यासाठी योगासन केले पाहिजे. धनुरासन आणि सूर्यनमस्कार तुमच्यासाठी खूप फायदेशीर असेल. जर तुम्हाला काही विषय घेऊन शोध कार्य करायचे असेल तर, या सप्ताहात तुम्ही सुरु करू शकतात. हा कालावधी तुमच्यासाठी खूप चांगला नाही सर्वसाधारण असेल आपल्या मेहनतीच्या अनुसार तुम्हाला फळांची प्राप्ती होणार नाही. थोडी आत्मविश्वासाची कमतरता पाहिली जाऊ शकते म्हणून, तुम्हाला या काळात चुका करण्यापासून सावध राहिले पाहिजे आणि स्वतःला एकाग्र ठेवण्यासाठी योग आणि ध्यान इत्यादींची मदत घेतली पाहिजे. सप्ताहाच्या शेवटी कौटुंबिक जीवनात आनंद येईल आणि भाग्याची तुम्हाला पूर्ण साथ मिळेल. कोर्ट कचेरीत रखडलेली कामे मार्गी लागणार आहेत. स्पर्धा परीक्षेत यश संभवते. **महिलांना :** सासुरवासीनीला आनंददायक बातमी मिळेल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत मात्र अधिक लक्ष द्या. नियमित व्यायाम करा, बेफिकीर राहू नका. **शुभ दिनांक -**०३,६

### जोडीदारासोबत वेळ घालवाल

**वृश्चिक :** या सप्ताहात उच्च अधिकाऱ्यांसोबत तुम्ही गरजेच्या मुद्द्यांना घेऊन बोलणी करू शकतात. तुम्ही नवीन कल्पना आपल्या बॉसला देऊ शकतात. यामुळे बॉसच्या नजरेत तुमची प्रतिमा सुधारेल. जर तुम्ही नोकरीमध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न करत असला, तर कुणी मित्रांकडून तुम्हाला फायदा होऊ शकतो. तुम्हाला कौटुंबिक व्यवसायात लाभ प्राप्त होईल. आपल्या वाणीच्या बळावर तुम्ही सामाजिक स्तरावर चांगले प्रदर्शन करू शकाल. चंद्राचे संक्रमण तुम्हाला भागीदारी आणि व्यवसायात नफा होऊ शकतो. तथापि, भागीदारीसोबत पारदर्शकता ठेवा. त्यांच्यापासून अशी कुठलीही गोष्ट लपवू नका, ज्यामुळे येणाऱ्या काळात तुमच्यामध्ये दुरी निर्माण होईल. या राशीतील विवाहित जातकांसाठी हा सप्ताह चांगला राहणार आहे. तुम्हाला जीवनसाथीसोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल.

**महिलांना :** मनातील पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. प्रकृतीची पथ्ये पाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. थोडी जिवाची घबराट होण्याची शक्यता राहील. ताण-तणावामुळे त्रास होऊ शकतो. **शुभ दिनांक -** ०४, ०६.

### भाग्यवंतांना सुवार्ता मिळेल

**धनु :** या सप्ताहात आपण तुम्ही गरजेचे काम टाळू शकतात. गरजू कामांना टाळणे नंतर तुम्हालाच मानसिक तणावही येऊ शकतो. म्हणूनच कामांना टाळू नका आणि वेळोवेळी सर्व काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. या राशीतील जे जातक गूढ विषयांचे अध्ययन करत आहेत, त्यांच्यासाठी वेळ चांगली राहील. तुम्ही धार्मिक कार्यात हिस्सा घ्याल. सोबतच, आपल्या घरचांसोबत मिळून काही धार्मिक यात्रेवरही जाण्याचा प्लॅन बनवू शकतात. चंद्राच्या संक्रमणाने तुमच्या भाग्यात वृद्धी होईल आणि या राशीतील पेशावर लोकांना कार्यक्षेत्रात चांगल्या फळांची प्राप्ती होऊ शकते. काहीवेळा यामुळे नात्यामध्ये चढ-उतार येऊ शकतो. तुम्ही आपल्या भावना आपल्या जवळच्यांसोबत मोकळ्याने ठेवू शकणार नाही, यामुळे तुम्हालाही त्रास होईल आणि तुमच्या जवळच्या व्यक्तींना ही त्रास होईल. जे जातक उच्च शिक्षण घेत आहेत, त्यांना अत्याधिक परिश्रम करावे लागतील. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये व पोटाच्या विकाराबाबत अधिक लक्ष द्या. काही भाग्यवंतांना सुवार्ता मिळण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक :** ०५,०६.

### मेहनतीचे फळ मिळले

**मकर :** या सप्ताहात आपण कार्यक्षेत्रात या काळात थोडे सांभाळून चालण्याची आवश्यकता आहे. तथापि, तुमचे उच्च अधिकारी तुमच्या कामाने प्रभावित राहतील. परंतु, तुमच्या अधिनस्थ कर्मचारी तुमच्या विरुद्ध कट रचू शकतात. जर काही प्रकारची आयडिया तुमच्या मनात आली, तर ती कुणाला सांगायच्या आधी उच्च अधिकाऱ्यांना सांगा. या काळात तुमचा स्वभाव थोडा आक्रमक होऊ शकतो. तुम्हाला तुमच्या आक्रमक स्वभावावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे, नाहीतर चांगली कामे बिघडू शकतात. या काळात तुम्हाला मागील मेहनतीचे फळ मिळेल आणि तुम्ही आपला व्यवसाय सुरु करण्याचा विचार करू शकतात. तथापि, या प्रकारचे मोठे निर्णय घेण्याच्या आधी अनुभवी लोकांचा सल्ला नक्कीच घ्या. या राशीतील जातकांसाठी सप्ताहाची सुरुवात खूप चांगली सांगितली जाऊ शकत नाही. या काळात तुमचा निष्काळजीपणा पाहिला जाऊ शकतो. **महिलांना :** महिलांना अंगीभूत कलांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. आर्थिक बाजू सावरता येईल. पण, अनावश्यक खर्चावर योग्य नियंत्रण ठेवा. **शुभ दिनांक :** ०४,०५.

### नवीन वाहन खरेदीचे योग

**कुंभ :** या सप्ताहात आपल्या राशीसाठी परदेशातून लाभ होऊ शकतो. खास करून जे व्यावसायिक विदेशाने जोडलेला व्यापार करतात त्यांच्यासाठी खूप चांगले राहण्याची अपेक्षा आहे. तसेच, मानसिक त्रास होण्याची शक्यता आहे. म्हणून मेडिटेशन करा आणि आपल्या मनाला शांत ठेवण्याचा प्रयत्न करा. आपण नवीन प्रॉपर्टी किंवा वाहन खरेदीचा विचार करू शकता. तथापि, बजेटच्या बाहेर कुठलीही वस्तू खरेदी करू नका. तसे एकूणच पाहिले असता हे दिवस या राशीतील जातकांसाठी चांगले राहण्याची अपेक्षा आहे. आपल्या कार्यक्षेत्रात तुम्हाला चांगले फळ मिळतील. जर तुम्ही व्यवसाय करतात तर, त्यात ही नफा मिळण्याची पूर्ण शक्यता आहे. कामाच्या संबंधात या काळात तुम्ही यात्रेवर जाऊ शकतात. **महिलांना :** कौटुंबिक जीवनात ही तुम्हाला सकारात्मक फळ मिळतील. जर तुमची वडिलांसोबत काही नाराजी असेल, तर ती या काळात दूर होऊ शकते. आपल्या वडिलांकडून तुम्ही विभिन्न कामाबाबतीत सल्ला घेऊ शकतात, तसेच तुम्ही धार्मिक यात्रेवर ही जाण्याची शक्यता आहे. घरात मंगलकार्य होऊ शकते, नवीन लग्न झालेल्याना आनंदी बातमी मिळेल. **शुभ दिनांक :** ०६,०७

### पदोन्नती मिळण्याची शक्यता

**मीन :** या सप्ताहात आपण आपल्याला आरोग्य संबंधित समस्या होऊ शकतात. आपली मानसिक स्थिती चांगली बनवण्यासाठी योग आणि ध्यान करा. आपण कार्यक्षेत्रात उत्तम प्रदर्शन करू शकता. तुमच्याद्वारे केलेल्या कामाचे उच्च अधिकाऱ्यांकडून कौतुक होईल. या राशीतील जातकास कार्यक्षेत्रात पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. तथापि, या काळात तुम्हाला आपल्या अहंकाराला मागे ठेवून आपल्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांच्या सोबत चांगला व्यवहार करण्याची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे तुम्हाला लाभ होण्याची पूर्ण शक्यता राहील. आर्थिक पक्षाला घेऊन काही समस्या चालू असेल, तर त्याही दूर होऊ शकतात. तथापि, कुठल्या अशा व्यक्तीला या काळात अशा लोकांना उधार देऊ नका, ज्यावर तुम्हाला विश्वास नसेल. कौटुंबिक जीवनासाठी वेळ चांगली राहील. मोठ्या भाऊ-बहिणींसोबत उत्तम वेळ घालवण्याची संधी मिळेल. **महिलांना :** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. नवीन ओळखीमुळे फायदा होईल. **शुभ दिनांक :** ०३,०४.

# गिरणगावाची 'जिवंत' स्मरण गाथा

**''आधी मरून झालं की, छान सुरु होतो जगण्याचा झंझावात :**
सर्व चराचाराला गुंडाळून स्वतःत
स्वतःलाही पार करत पुढे पुढे धावत
असं जगणं'' (नामदेव ढसाळ)

नामदेवरावांच्या या ओळी अचानक आठवण्याचं कारण म्हणजे, 'आणखी एक मोहोनजोदारो' हा गिरणी कामगार संपावर आधारित माहितीपट! १९८२ मध्ये केलेल्या या प्रदीर्घ संपाने गिरणी कामगारांचे कंबरडेच मोडले, इतकेच नव्हे, तर संपूर्ण गिरणगाव उद्‌ध्वस्त होऊन तेथे नवीन 'संस्कृती' रुजवण्याचा प्रयत्न अजूनही सुरूच आहे. ज्या प्रमाणात मोहोनजोदारो संस्कृती १९ व्या शतकात उत्खनन केल्यावर सापडली, त्या संस्कृतीविषयी काही माहिती हाती आली, अगदी तसेच संपाच्या सुरुवातीपासून खोदकाम करून ख्यातकीर्त चित्रपट समीक्षक अशोक राणे यांनी गिरणगावाच्या संस्कृतीचा मनोहारी वेध घेतलेला आहे. अशोक यांनी घेतलेला हा वेध शनिवारी संध्याकाळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात पाहण्याचा योग आला. विशेष म्हणजे, गेल्याच आठवड्यात या माहितीपटास मानाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. दोन तासांच्या या माहितीपटाने 'हाऊसफुल्ल' झालेल्या सभागृहाला एका वेगळ्याच अर्थाने मंत्रमुग्ध केले होते, एक वेगळ्या प्रकारचे 'स्मरण रंजन'च म्हणा ना हवं तर! या तुडुंब भरलेल्या सभागृहात समाजाच्या सर्वच थरातील माणसे होती. कामगार नेते होते, खेडाळू होते. नाट्य चित्र समीक्षक होते, नाट्य चित्र कलाकार होते. सरकारी अधिकारी होते, पत्रकार होते आणि अनेक गिरणी कामगार आवर्जून या सभागृहात दूरवरून आलेले होते. विशेष म्हणजे, मुंबईच्या एका टोकाला कार्यक्रम असूनही शेवटपर्यंत कुणीही जागा सोडलेली नव्हती!

कार्यक्रम अर्धवट सोडून जाण्याचा प्रश्नच नव्हता. कारण, ''पटकूर खांद्यावर टाकून सह्याद्री घाट उतरून माझा बाप तुझ्या दारावर उभा राहिला श्रम घेऊन केव्हा येई केव्हा निघून जाई, ठाऊक जन्म दात्रीला पोक आलेल्या म्हाताऱ्या घरात एका रात्री माझा जन्म झाला'' (नारायण सुर्वे) तर अशीही जन्मापासून जुळलेली नाळ असल्याने मुंबईच आपली मानलेल्या कामगारांची ही शोकांतिका कुठेही बटबटीतपणा न आणता अशोकरावांनी आपल्यापुढे सहजरित्या मांडल्याबद्दल ते अभिनंदनास पात्रच आहेत.

हा संपूर्ण माहितीपट अशोकरावांनी प्रख्यात नाटककार स्व. जयंत पवार व गिरणी कामगारांना समर्पण करून सिक्सरच मारली. जयंत पवार यांचे एकूणच कामगार वर्गाविषयी सहानुभूतीचे धोरण मी स्वतः पाहिलेले आहे. म्हणूनच असे करणे अत्येत उचित होते, असेच वाटते.

> **ज्या प्रमाणात मोहोनजोदारो संस्कृती १९ व्या शतकात उत्खनन केल्यावर सापडली, त्या संस्कृतीविषयी काही माहिती हाती आली, अगदी तसेच संपाच्या सुरुवातीपासून खोदकाम करून ख्यातकीर्त चित्रपट समीक्षक अशोक राणे यांनी गिरणगावाच्या संस्कृतीचा मनोहारी वेध घेतलेला आहे.गिरणगावातली संस्कृती कशी सर्वसामावेशक होती, हे मुंबईकरांना माहीत आहेच. तत्कालीन गिरण्यांमध्ये बापाच्या जागी मुलगा कसा लागत असे, हे आजही लालबाग परळ विभागात अभिमानाने सांगितले जाते. तेथील सणवार, तेथील कबड्डी, खो-खोचे प्रेम, कामगार रंगभूमी, दशावतार आदी सर्व प्रकारांची झलकही पाहायला मिळते. सांस्कृतिक बदल जसा दिसतो, तसा राजकीय व कामगार चळवळीची ही झलक पाहावयास मिळते. संप प्रदीर्घकाळ न करता एकजूट दाखवल्यानंतर समेट करण्याची पद्धत ही होती, असे अधोरेखित केलेले आहे.**

गिरणगावातली संस्कृती कशी सर्वसामावेशक होती, हे मुंबईकरांना माहीत आहेच. तत्कालीन गिरण्यांमध्ये बापाच्या जागी मुलगा कसा लागत असे, हे आजही लालबाग परळ विभागात अभिमानाने सांगितले जाते. तेथील सणवार, तेथील कबड्डी, खो-खोचे प्रेम, कामगार रंगभूमी, दशावतार आदी सर्व प्रकारांची झलकही पाहायला मिळते. सांस्कृतिक बदल जसा दिसतो, तसा राजकीय व कामगार चळवळीची ही झलक पाहावयास मिळते. संप प्रदीर्घकाळ न करता एकजूट दाखवल्यानंतर समेट करण्याची पद्धत ही होती, असे अधोरेखित केलेले आहे. गिरणी कामगारांचे तत्कालीन एकमेव नेतृत्व स्व. डांगे यांनी एका संपात स्व. सुभाष बाबू यांना कामगारांसमोर आणले होते, ही आठवण देऊन भरपावसात सुभाषबाबूंनी केलेल्या भाषणाच्या वेळी कामगारांनी छत्र्या उघडताच 'अरे सुभाषबाबूंना कसे कळणार की ते कुणापुढे बोलत आहात' असे डांगे यांनी सांगताच सर्व छत्र्या मिटल्या गेल्या आणि पावसात चिंब होऊन कामगारांनी सुभाषबाबूंचे भाषण ऐकले. (मला उगाचच गेल्या विधानसभा निवडणुकीतील प्रचाराच्या दरम्यान केलेले सातारा येथील भाषण आठवले) संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील गिरणी कामगारांचे योगदान विसरताच येणार नाही, इतके मोठे आहे. परंतु, सध्या मात्र गिरणी कामगारांची प्रतिक्रिया काहीशी कडवट झालेली दिसते. 'आजची मुंबई


**विजयकुमार काळे**

आमची नाहीच, आमचा बाप या मुंबईसाठी झगडालाच न्हवता' असे थेट बोलायला कमी करत नाहीत.

**''कळू आले तेव्हापासून**
**डबा घेऊन साच्यावर गेलो**
**घडवतो लोहार हातोड्याला**
**तसाच घडवला गेलो**
**शिकलो तार कशी लावावी**
**बाबीण कशी भरावी धोट्यात**


''वेळ आलीच तर हक्कासाठी केव्हा करावी आऱ्या खाल्यांत'' (नारायण सुर्वे) म्हणजे कापड गिरणीत कामाला लागल्यापासून या गिरण्या प्रदीर्घ संपानंतर बंद होईपर्यंतचा दुःखदायक प्रवास सलग दाखवलेला आहे. नेहमीच्या दुःखाला सांस्कृतिक कार्यक्रमांची झालर लावून बटबटीतपणा टाळून हे आपल्यासमोर उलगडत असल्याने ते कंटाळवाणे होत नाही. या सांस्कृतिक पटलावर राजकीय नेते येतात, पण ते तेवढ्यापुरतेच. नंतर मात्र डॉ. दत्ता सामंत यांच्या कामगार संघटनेने पुकारलेला संपाचे पुसट असे चित्र दाखवले गेले आहे. त्या आधी प्रत्येक संपानंतर पगारात अवघी काही रुपयांची वाढ करून संपात समेट घडवला जात असे. पगारात जरी तुटपुंजी वाढ असली, तरी महागाई भत्यात वाढ होत असे सांगून कामगारांची समजूत काढली जात होती. तरुण कामगारांना हे पाहून त्रास होत होता, कामगार नेत्यांच्या चिकन्या चुपड्या भाषणांनी आपली दिशाभूल केली जात आहे, याची जाण कामगार वर्गात निमर्ण झालेली होती. त्यातच भांडवलदारांचा कावा शिकलेल्या कामगारांच्या ध्यानात येत होता. आता त्यांची भूक केवळ चार -पाच रुपयांनी भागणार नव्हती. त्यातच औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाने भरघोस पगारवाढ दिल्याचे ही मंडळी वर्तमानपत्रात वाचत होती. त्यातच तत्कालीन संपाच्या हाकेतून सर्व प्रमुख राजकीय नेत्यांनी अंग काढून घेतल्याने लढण्याच्या ईर्षेने तयार झालेला कामगार काहीसा जरूर हिरमुसला; परंतु त्वेशाने डॉ. सामंत यांच्याकडे गेला. सामंत यांना प्रथम यात पडायचेच नव्हते; परंतु कामगारांच्या रेट्यापुढे त्यांचे काहीही चालले नाही. आणि, सरतेशेवटी हा संप पुकारला गेला, सुमारे ४० वर्षानंतरही अजून हा संप अधिकृतपणे मागे घेण्यात आलेला नाही. काहीसे विषयांतर होईल, पण ते गरजेचे आहे १९८४ च्या मध्यावर आमच्या इंडियन एक्स्प्रेसमध्येही बोनस व इतर मागण्यांवरून संप पुकारण्यात आला होता. सुमारे साडेपाच महिने हा संप चालला; परंतु स्व. रामनाथ गोयंका हे काही डॉ. सामंताना बधले नाहीत. अखेर बहुसंख्य कामगारांना हमीपत्र देऊन कामावर घेण्यात आले. या संपात फूट पडून पेपर बाजारात काढण्यापर्यंतचे मनुष्यबळ कंपनीकडे असल्याने तो संप फसलाच होता. झाले रामनाथ गोयंका यांनी सामंतांना नमवले, ही वार्ता गिरणी मालकांना स्फुरण देणारी ठरली, मग गिरणी मालक ही चर्चा करण्यास पुढे आले नाहीत. या माहितीपटाच्या सुरुवातीलाच राणे यांनी स्पष्ट केले होते की, गिरणी कामगारांच्या संपापर्यंतच आम्ही कालमर्यादा घालून घेतलेली आहे. त्यामुळे अर्थातच प्रदीर्घ संप संपल्यानंतरचे किंवा फसल्यानंतरचे राजकारण, डाव-प्रतिडाव, देवाण-घेवाण, सरकारी निर्णयांची फिरवाफिरव, गिरण्या उभ्या असलेल्या भूखंडाबाबतचा वाद आदी वादग्रस्त बाबी यात नाहीत. इतकेच काय, पण गिरण्यांच्या काही भूखंडावर निवासी व व्यापारी संकुले आली. पण, त्या भूमीपुत्रांचा सहभागच नाही. नोकऱ्यांबाबत ही कामगारांच्या तोंडाला पाने पुसली गेली.

संताजनक बाब म्हणजे, त्या जागांवर बांधलेल्या निवासी इमारतीत बाहेरचीच माणसे कशी घुसली व खरोखरचे कामगार अजूनही कसे दारोदारी फिरत आहेत, हेही कुठेतरी यायला हवे होते, अशी मनीषा कार्यक्रम संपल्यावर घरी जाताना अनेकांनी माझ्याजवळ व्यक्त केली. पण, हा माहितीपटाचा विषयच नसल्याने तो आला नाही हे जरी खरे असले, तरी उगाचच वाद नको, असा निर्मात्यांनीसुद्धा विचार केलेला असावा, असे दिसते. **




# महापुरुषांचे पुतळे आणि राजकारण

**धनंजय शेटये**



महापुरुषांचे पुतळे आज फक्त आणि फक्त राजकारणाचा विषय बनत चालला आहे. त्या थोर महापुरुषांचे कार्य जनसामान्यांच्या मनात कायम असावे.त्यांच्या कार्यकर्तृत्वाची प्रेरणा सदैव आपल्या विचारांमध्ये तेवत राहावी. त्यांचे आदर्श जीवन नेहमीच लक्षात राहावे. त्यांच्याबद्दलचा आदरभाव नव्या पिढीला स्मरणात राहावा यासाठी थोरामोठ्या महापुरुषांचे भव्यदिव्य पुतळे चौकाचौकात उभारले जातात. शिवाजी महाराजांचा जगातील पहिला पुतळा उभारण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी पुढाकार घेतला. त्यांनी पुण्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्याचा विचार मांडला. त्यानंतर पुण्यातील ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीमध्ये १९१७ साली हा पुतळा उभारण्याचा निर्णय झाला आणि तब्बल अकरा वर्षांच्या मेहनतीनंतर अनेक संकटांना पार करत हा पुतळा प्रत्यक्षात साकार झाला. या पुतळ्याच्या भूमीपूजनाचे आमंत्रण इंग्रजांचा युवराज प्रिन्स एडवर्ड याने स्वीकारले होते. ज्या इंग्रजांनी शिवाजी महाराजांचा चुकीचा इतिहास लिहिला होता, त्याच इंग्रजांचा युवराज यानिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासमोर नतमस्तक झाला.

आज चौकाचौकात अनेक महापुरुषांचे पुतळे विराजमान झालेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे.जनसामान्यांच्या मनात महाराजांबद्दल प्रचंड आदर आहे. जगात अनेक राजे होऊन गेले असतील, आजच्याही काळात महान नेतृत्व असणारे अनेक नेते असतील; पण शून्यातून जग उभारणारे, रांगड्या मावळ्यांना हाताशी घेऊन स्वराज्याचे तोरण बांधणारे छत्रपती शिवाजी महाराजच! आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांसारखे राजे एकमेवाद्वितीयच. 'जाणता राजा' संपूर्ण जगाचा आदर्श राजा ठरला. संपूर्ण जगात नौदलाची संकल्पना प्रस्थापित करणारे नौदलाचे जनक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! मंत्रिमंडळ ही संकल्पना प्रस्थापित करणारे छत्रपती शिवाजी महाराज. आपल्या महाराजांनी जगातले पहिले मंत्रिमंडळ स्थापन केले. अष्टप्रधान मंडळ! न भुतो न भविष्यति असा राजा जगामध्ये एकमेव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्यकर्तृत्व महान आहे. जगातील सर्वश्रेष्ठ राजा म्हणून नावलौकिक मिळालेले आमचे महाराज आहेत.

पण आपण फक्त त्यांच्या पुतळ्यातच अडकून राहून काय फायदा? महाराजांचे विचार आत्मसात करायला नको का? आजच्या तरुणाईला महाराजांच्या कार्याची महती माहीत असायला हवी. महाराज केवळ पुतळा नव्हते. ते जनतेचे 'राजे' होते. जनसामान्यांवर अन्याय होत असेल तर ते सहन करत नसत. गुन्हेगाराला कठोरातली कठोर शिक्षा देत असतं. पुन्हा गुन्हा करण्याची हिंमत फक्त गुन्हेगारच नाही, तर पुढे कोणीही असा गुन्हा करण्यासाठी हिंमत करता कामा नये. परस्त्री मातेसमान जाणणारे, गो ब्राम्हण प्रतिपालक सर्वसामान्य जनतेच्या प्रत्येक समस्येचे निराकरण करणारे राजे होते. महापुरुषांच्या पुतळ्यांवर प्रेम करणाऱ्या लोकांनी त्यांच्या विचारांवरही प्रेम करायला हवे. महाराजांची शौर्यगाथा आज विद्यार्थ्यांच्या मनामनात पोहोचली पाहिजे. त्यासाठी आपल्याला काही उद्‌बोधक करता येईल का पाहावे. समाजातल्या भ्रष्टाचाराविरुद्ध, वाईट गोष्टी, अन्याय, अत्याचाराच्या विरोधात नक्कीच लढावे.पेटून उठावे. पण, शासकीय संपत्तीची तोडफोड करुन अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार संपणार आहे का? शासकीय संपत्तीची तोडफोड म्हणजे ती संपत्ती आपलीच सर्वसामान्य जनतेच्या कष्टातूनच उभी राहिली आहे ना? त्या निर्जीव वस्तूंवर राग काढून, तोडफोड करुन काय फायदा होणार आहे का? त्या शासकीय संपत्तीची भरपाई करण्यासाठी सर्वसामान्य जनतेच्या करातून पैसा वसूल केला जाणार, अशी आंदोलने ही शेवटी जनतेच्या उरावर येत असतील तर काय कामाची?

सर्वसामान्य जनतेने भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवला पाहिजे. पण अशा पद्धतीने नाही. भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी ताकद लागत नाही तर अत्याचार, अन्यायाविरुद्ध लढण्याची हिंमत, नवे विचार आत्मसात करायला जिगर असायला हवी. अशा भ्रष्टाचार करणाऱ्या राजकारण्यांना घरी बसविण्यासाठी धाडस करायला हवे. निवडणुकीच्या मतदानप्रसंगी पाचशे-हजार रुपयांना बळी पडून आपली सद्‌सद्‌विवेकबुद्धी गहाण टाकून आपण अन्यायाविरुद्ध लढा देऊ शकत नाही.

मुळात, महापुरुषांचे अनुयायी हे फक्त कोणत्या एका धर्माचे, एका जातीचे, एका पंथाचे किंवा फक्त एका समुदायाचे नसावेत. महापुरुषांचे योगदान सर्वांसाठी समान न्याय, समानता देणारे असते, त्यामुळे ते महापुरुषांचे पुतळे हे सर्वांनाच आदराचे स्थान असते. महापुरुषांना असे आपापसात आपण वाटून घेऊ नये. संपूर्ण देशासाठी ते महापुरुष असतात. चौकाचौकात असणाऱ्या प्रत्येक महापुरुषांच्या पुतळ्याची निगा, सुरक्षा ही सर्वांचीच जबाबदारी आहे याचे भान असायला हवे.प्रत्येक माणसाला आपला धर्म, आपली जात, आपला पंथ, आपला समुदाय अत्यंत प्रिय असतो. आपल्या धर्माबद्दल, धर्माच्या दैवताबद्दल अथवा समुदायाच्या श्रेष्ठ महापुरुषांबद्दल कोणी अपमान केला तर प्रचंड राग येत असतो, त्यामुळे अशा लोकांची भावनिकता जाणून राजकीय पोळी भाजणारे अनेक विघ्नसंतोषी लोक धार्मिक, जातीय, पंथीय राजकारणात तेल ओतून भडका उडविण्याचे काम करणारे समाजकंटक अनेक असतात.

आपण सर्वांनी भारतीयत्वाचा अंगीकार करायला हवा. फक्त पुतळ्यांच्या राजकारणात अडकून न पडता आपण ऐक्याचे सामाजिक बंध निर्माण करायला शिकले पाहिजे. महापुरुषांचे पुतळे ही आपली खरी वैचारिक संपत्ती आहे, तिचे वैचारिक जतन करायला शिकले पाहिजे. आजच्या तरुणाईला सामाजिक बांधिलकीचे भान असायला हवे. समाजासाठी आपण आणि आपल्यासाठी समाज असतो. त्यामुळे समाजात माथी भडकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजकंटक लोकांना सामाजिक ऐक्याच्या मार्गाने धडा शिकवला पाहिजे. सर्वधर्मसमभाव ही भावना मनामनात रुजवली पाहिजे. राजकारणी लोकांनी आपला वापर करता कामा नये तर राजकारण्यांना आपल्या समाजासाठी वापरायला तरुणांना भाग पाडले पाहिजे.

# तुका आकाशा एवढा!



**जावे संतांच्या गावा!**

**अनुराधा म्हात्रे**

**ज्ञानेश्वर महाराजः भाग तिसरा**

तुकाराम महाराज प्रपंचात एका मागून एक संकटे झेलत चालले होते. 'सुख पाहता जवा पाडे, दुःख पर्वताएवढे' याचा अनुभव ते घेत होते. प्रपंचाचे मायावी स्वरूप त्यांना कळून चुकले! त्यांनी आपले मन परमार्थाकडे वळवले. कीर्तन करणे, एकादशी व्रत धरणे, मनोभावे संत सेवा करणे, भंगलेल्या मंदिराची दुरुस्ती करणे या सर्वाद्वारे ते आपली काया आणि मन परमार्थाकडे लावू लागले. साधक ते सिद्ध पुरुष असा त्यांचा प्रवास सुरू झाला. या संक्रमण काळांमध्ये त्यांची मनःस्थिती फारच नाजूक झाली असावी. प्रपंचाचे पाश अजूनही मागे ओढत होते. सगेसोयरे त्यांच्या दृष्टीने या 'वाया' गेलेल्या तुक्याला मार्गावर आणण्यासाठी हितोपदेश करत होते, पण तुकोबारायांनी 'चित्ती एक रखुमाईचा पति' निश्चयपूर्वक कवटाळला होता. आपल्या या स्थितीबद्दल ते म्हणतात,

**वचन मानीलें नाही सुहदांचें।**
**समूळ प्रपंचे वीट आला।।**
**सत्य असत्यासी मन केलें ग्वाही।**
**मानीयेले नाही बहुमतां।।**

ते बहुमताच्या फासात अडकले नाहीत. सत्य काय, असत्य काय याचा विचार करून खंबीर मनाने परमार्थाची वाटचाल करू लागले. हळूहळू त्यांची देहबुध्दी कमी होऊ लागली, चित्तशुद्धी झाली. भगवंतप्राप्तीची त्यांना तीव्र तळमळ लागली. एकदा गुरुवारी, माघ शुद्ध दशमीला रात्री, तुकोबा कीर्तन करून मंदिरातच झोपले होते. त्यावेळी त्यांच्या स्वप्नांत सद्‌गुरु आले. बाबाजी चैतन्य असे त्यांनी आपले नाव सांगितले. त्यांनी 'राम कृष्ण हरि' हा मंत्र दिला. तुकोबारायांनी हा मंत्र आपला जीवभाव केला, त्याबाबत ते स्वतःच म्हणतात,

**मानियेला स्वप्नीं गुरूचा**
**उपदेश। धरिला विश्वास दृढ नामीं।।**

गुरूंनी दिलेल्या 'राम कृष्ण हरी' मंत्रासोबत त्यांची वाटचाल चालू झाली. त्यांनी स्वतःही अनेक ग्रंथांचे वाचन करून मनन चिंतन सुरू केले. तुकाराम बुवांनी ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, कबीर इत्यादी संतांचे ग्रंथ वाचले होते. गीता, ज्ञानेश्वरी, भागवत एकनाथी भागवत, रामायण, महाभारत या ग्रंथांचे त्यांनी शतशः वाचन केले होते. असे म्हणतात की, श्रीतुकोबारायांनी एकनाथी भागवत या ग्रंथाची एक हजार पारायण केले होती. संतांचे ग्रंथ वाचण्याबाबत त्यांनी स्वतः लिहून ठेवले आहे,

**'कांही पाठ केलीं संतांचीं उत्तरें।**
**विश्वासें आदरें करोनियां।।**

त्यांची श्रवण भक्तीही मोठी होती. अनेक कीर्तने, पुराणे त्यांनी ऐकली होती. भक्तांचा नित्यक्रम काय असावा याबाबत त्यांनी म्हटले आहे,

**'गीता भागवत करिती श्रवण।**
**आणिक चिंतन विठोबाचें।।'**

अर्थात, हा नित्यक्रम ते स्वतः आचरत होते. चिंतनासाठी त्यांनी भंडारा डोंगर भामचंद्र डोंगर ही शांत ठिकाणी निवडली. एक दिवस तुकाराम बुवा कुणालाही न सांगता घराबाहेर पडले. ते सरळ गावाजवळच्या भामचंद्र डोंगरावर आले. या डोंगरावर तुकाराम बुवांना साक्षात्कार झाला अशी वारकरी संप्रदायाची श्रद्धा आहे. त्यावेळी तिथे सर्वत्र दाट जंगल होते. त्या जंगलांमध्ये सर्प विंचू यांचा सुळसुळाट होता. हिंस्र श्वापदे ही असावित. बुवाना तेथे गुहा दिसली. तिथे बसून ते शांतपणे ईश्वर चिंतन करू लागले. पंधरा दिवस ते ईश्वरभक्तींत तल्लीन झाले. अनन्य भावाने इतका धावा केल्यानंतर तो परम दयाळू भगवंत भेट न देईल तरच नवल! बुवांना साक्षात्कार झाला.

'पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार झाला। विठोबा भेटला निराकार।।
भामगिरी पठारी वस्ती जाण केली। वृत्ती स्थिरावली परब्रम्हीं।।'

तुकाराम भामचंद्र डोंगरावर आत्मानंदात रमले खरे; पण इकडे त्यांच्या घरी ते नाहीसे झाल्यामुळे हाहाकार उडाला. पत्नी जिजाबाई येणाऱ्या जाणाऱ्यांकडे तुकोबांची चौकशी करू लागली. ती काळजीत पडली. धाकटे बंधू कान्होबा यांचेही तुकारामांवर अतिशय प्रेम होते. त्यांनी दोन-चार माणसे सोबत घेऊन सगळा गाव पिंजून काढला; पण तुकोबांचा कुठेच पत्ताच नव्हता. घरात कुणालाच अन्नपाणी गोड लागे ना! अखेर कान्होबांनी गावच्या पंचक्रोशीत तुकोबांना शोधण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार ते गावाबाहेर पडून सगळीकडे शोध घेऊ लागले. शोधत शोधत ते भामचंद्र डोंगरावर आले. तिथे एका गुहेमध्ये शांतपणे बसलेल्या तुकारामांकडे त्यांचे लक्ष गेले. त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी तुकारामाला मिठी मारली, काळजीपोटी अनंत प्रश्न विचारले. त्यांची समजूत घातली, विनवण्या केल्या आणि तुकारामांना घेऊन ते घरी आले. जिजाबाई बुवांच्या वाटेकडे डोळे लावूनच बसली होती. तुकोबाराया दिसताच तिने धावत जाऊन पायाला मिठी मारली. त्यादिवशी घरात दिवाळी दसऱ्यासारखा आनंद झाला. तुकोबाराया घरी आले खरे; पण त्यांची वृत्ती पूर्ण पालटली होती. आधीच वैराग्यशाली असलेले बुवा पूर्णविरक्त झाले. त्यांना जीवनाचे सत्य उमजले आणि आत्मस्वरूपाचे ज्ञान मिळाले होते. देवाचा शोध घ्यायला घराबाहेर पडलेल्या तुकारामांना देव आपल्याच हदयात आहे; याची जाणीव झाली. आपल्याप्रमाणेच तो प्रत्येक भूतमात्रांत आहे, हा बोधही झाला. या ज्ञानामुळे आधीच कनवाळू वृत्तीचे असलेले तुकारामबुवा 'मेणाहुनी मऊ' झाले. सर्वत्र त्यांना ईश्वरच दिसू लागला. तुकारामांच्या घरांत सावकारी होती. अनेक लोकांनी केलेल्या गहाणखतांचे ढीग होते. ही सर्व कागदपत्रे तुकारामांनी बाहेर काढली आणि कान्होबांना म्हणाले, 'हे बघ, या दुष्काळांमध्ये लोक आपलं कर्ज फेडू शकणार नाहीत, मग कशाला ठेवायची ही गहाणखते? आपण ती नष्ट करू.'' कान्होबांनी त्यांची परोपरीने समजूत काढण्याचा प्रयत्न केला. बुवा मात्र आपल्या निश्चयावर ठाम होते. अखेर कान्होबा म्हणाले, 'ही गहाणखते तुमच्या एकट्याचीच नाहीत. त्यात माझाही वाटा आहे.'' तुकोबांनी लगेच कागदपत्रांचे दोन भाग केले. एक भाग कान्होबांच्या स्वाधीन केला आणि दुसरा भाग घेऊन नदीवर गेले व सर्व कागदपत्रे विसर्जित केली.



तुकोबांचे हे वागणे त्यांच्या साधुत्वाला शोभा देणारे होते; पण त्यामुळे संसारात उणेपणा येत होता. जिजाबाईंना याचा संताप यायचा. मुलाबाळांची व्यवस्था त्यांनाच पहावी लागायची. संसाराची उस्तवार ती माऊली मोठ्या कष्टाने करत होती. त्यामुळे तुकोबांच्या सतत चालणाऱ्या भजन-कीर्तनाचा त्यांना मोठा राग येत असे.

**'उठितें तें कुटितें टाळ।**
**अवघा मांडिला कोल्हाळ।।**
**जिवंतचि मेले।**
**लाजा वाटोनियां प्याले।।'**

असा त्रागा त्या करायच्या. संसाराच्या रगाड्यात त्या भरडल्या जात होत्या. त्यामुळे हा संताप स्वाभाविक वाटतो. तथापि, जिजाबाई ही पतिव्रता स्त्री होती. तुकोबांबद्दल त्यांच्या मनात अपार ममत्व होते. त्यांना जेवू घातल्याशिवाय त्या स्वतः अन्नग्रहण करत नसत. नवऱ्याला शोधण्यासाठी भाकरीचं गाठोड घेऊन जिजाबाई रानोमाळ हिंडत असत. असेच एकदा तुकोबांचे जेवण घेऊन त्या डोंगरावर गेल्या असता त्यांच्या पायांमध्ये कांटा रुतला. प्रत्यक्ष विठोबाने गुराख्याचे रूप घेऊन पायातला कांटा काढला; अशी कथा सांगितली जाते. पांडुरंग भक्तांची काळजी वाहतोच, पण त्याच्या भक्तांची सेवा करणाऱ्यांची ही काळजी वाहतो असा तो भक्तवत्सल आहे.

तुकोबा स्थितप्रज्ञ होते. इंद्रिय आणि मन त्यांनी ताब्यांत ठेवले होते. कितीही नुकसान होणार असले तरी असत्य बोलायचे नाही; हा त्यांचा बाणा होता. परमेश्वराचे चिंतन व नामस्मरण हे व्रत ते अनन्य भावाने आचरणात आणत होते. तुकोबांच्या त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर

**'तुटो हे शरीर, तुटो हे मस्तक ।**
**नामाचा गजर सोडू नये।।'**

**

# अध्यापनात गणिती क्लृप्त्यांच्या वापर हवा!



आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

गणित अध्यापन पद्धतीचा शिक्षकाने व्यवस्थित अभ्यास केला तर विद्यार्थी परिणामकारकपणे शिकतो. कारण, त्या गणिती संकल्पना शिक्षकाने तेवढ्याच पोटतिडकीने विद्यार्थ्यांसमोर मांडलेल्या असतात. गणित अध्यापनाचा उपजत गुण एखाद्या शिक्षकाला असूही शकेल. पण, काहींना मात्र तो सराव, प्रशिक्षण, नाविन्याचा शोध याद्वारे गणिती अध्यापन पद्धती अंगी बाणवता येतील. नवनवीन गणिती क्लृप्त्यांचा शोध घेऊन आपल्या विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवता येतील.

गणित अध्यापन त्या दिवसेंदिवस सुधारणा व नवनवीन शोध लागताना दिसत आहेत. नाविन्यपूर्ण क्लृप्त्या रोज नव्याने समोर येताना दिसत आहेत. त्यांच्यातही काही गुण-दोष आहेत. त्यातील गुणांचा अधिक वापर करून त्या वर्गातील अध्यापन पद्धती वापरल्या पाहिजेत. तसेच कोणती क्लृप्ती कधी वापरावी, हेसुद्धा अभ्यासले पाहिजे.




आज संपूर्ण भारत देशात गणित विषयाची राज्यानुसार स्थिती पाहिली असता सर्वेक्षणात आपल्या महाराष्ट्र राज्याची स्थिती फारच विदारक असल्याचे चित्र आपणा समोर आहे. याचे मूळ शालेय स्तरावरील गणित विषयाच्या कच्च्या पायात दिसते. यासाठी शालेय स्तरावर गणित विषयाचे आकलनयुक्त अध्यापन होणे आवश्यक आहे. नाविन्यपूर्ण क्लृप्त्यांच्या वापरातून हे साध्य होऊ शकते का? शालेय स्तरावर गणित विषयाच्या रंजक अध्ययन-अध्यापनासाठी नाविन्यपूर्ण क्लृप्त्या कितपत प्रभावी व उपयुक्त ठरतील? हे सतत शिक्षकांनी शोधत राहिले पाहिजे.

गणित विषयाबाबत तर प्रत्यक्ष अनुभव व मार्गदर्शनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आताचे विद्यार्थी हे कुशाग्र बुद्धीचे आहेत. त्यांना ज्ञानापासून वंचित ठेवता येणार नाही. त्यांना सतत शिक्षक मित्रांनी पारंपरिक अध्यापन पद्धतीद्वारे शिकवून चालणार नाही. जर असे केले, तर विद्यार्थ्यांना गणित विषय शिकण्यात रस वाटणार नाही.


यासाठी गणित अध्यापनात नाविन्यपूर्ण क्लृप्त्या वापरून विद्यार्थी गुणवत्तापूर्ण होणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी विविध नाविन्यपूर्ण गणिती क्लृप्त्यांची घटकानुरूप निर्मिती करून विद्यार्थ्यांना गणित विषयात गोडी लावणे गरजेचे आहे.

उच्च प्राथमिक स्तरावरील गणित विषयाच्या घटकांवर आधारित नाविन्यपूर्ण क्लृप्त्या तयार करून कमी वेळेत, कमी खर्चात गणित विषयातील अवघड घटक सोप्या पद्धतीने समजण्यास मदत होईल. अध्यापनात रंजकता येऊन विद्यार्थी अवधान टिकवून ठेवण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण क्लृप्त्या प्रत्यक्ष हाताळण्यास मिळाल्यामुळे गणित अभ्यासात गोडी निर्माण होईल. गणित विषयात रुची वाढून विद्यार्थ्यांच्या गणित विषयाच्या संपादणुकीमध्ये भर पडेल.

त्याचबरोबर हे संशोधन नवीन संशोधकांना मार्गदर्शक साहित्य म्हणून उपोयोगी पडेल. नवीन संशोधक शिक्षक मार्गदर्शक यांना गणिती क्लृप्त्या तयार करण्यास मार्गदर्शक ठरेल. त्याचबरोबर गणिती समस्यांवर नवीन उपाययोजना राबविण्यास मदतगार होईल. **

# वैचारिक संघर्ष

> देश आणि समाजाच्या हितासाठी त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका मानवतावादी राहिल्या आहेत, हेच या पुस्तकाद्वारे अधोरेखित केले गेले आहे. या पुस्तकाला प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांची प्रस्तावना लाभली आहे. प्रा. कोकणे यांनी हे पुस्तक ज्या विषयावर लिहिले आहे, त्याच विषयावर डॉ. गवई यांच्या मार्गदर्शनाखाली संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून राज्यशास्त्र या विषयात, पाच वर्षांपूर्वी आचार्य पदवी घेतली. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील वैचारिक संघर्षात प्रामुख्याने केंद्रबिंदू राहिला तो दलित अस्पृश्य समाज. प्रा.डॉ. ईश्वरदास कोकणे यांच्या या ग्रंथामुळे स्वातंत्र्यपूर्व काळातील काही महत्त्वपूर्ण घटनांचा मागोवा घेणे शक्य होणार आहे.




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर-वैचारिक संघर्ष, हे ईश्वरदास कोकणे यांचे पुस्तक, अमरावती येथील वेद मुद्रा प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला प्रा. कोकणे यांनी 'मनोगत' मांडले आहे. भारतीय इतिहासाच्या एका महत्त्वपूर्ण कालखंडास प्रभावित करणारे महापुरुष म्हणून म. गांधी आणि डॉ. आंबेडकर यांना ओळखले जाते. या दोन महापुरुषांच्या वैचारिक द्वंद्वांचे विश्लेषण करणारे काही पैलू या पुस्तकाद्वारे वाचकांसमोर आणले गेले आहेत. मात्र, हा वैचारिक संघर्ष शत्रुभावी नव्हता, तर निखळ विवेकशील होता.

देश आणि समाजाच्या हितासाठी त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका मानवतावादी राहिल्या आहेत, हेच या पुस्तकाद्वारे अधोरेखित केले गेले आहे. या पुस्तकाला प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांची प्रस्तावना लाभली आहे. प्रा. कोकणे यांनी हे पुस्तक ज्या विषयावर लिहिले आहे, त्याच विषयावर डॉ. गवई यांच्या मार्गदर्शनाखाली संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून राज्यशास्त्र या विषयात, पाच वर्षांपूर्वी आचार्य पदवी घेतली. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील वैचारिक संघर्षात प्रामुख्याने केंद्रबिंदू राहिला तो दलित अस्पृश्य समाज. माणूस म्हणून या समाजाला शेकडो वर्षे भारत वर्षामध्ये हे स्थान नाकारले गेले होते. प्रा.डॉ. ईश्वरदास कोकणे यांच्या या ग्रंथामुळे स्वातंत्र्यपूर्व काळातील काही महत्त्वपूर्ण घटनांचा मागोवा घेणे शक्य होणार आहे. एकूण नऊ प्रकरणातून हे पुस्तक वाचकांसमोर उलगडते. या पुस्तकाचे समर्पक मुखपृष्ठ डॉ. सभाष गवई यांच्या संकल्पनेतून साकारले गेले आहे.

महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील वैचारिक संघर्ष प्रामुख्याने गोलमेज परिषद, पुणे करार आणि अस्पृश्यता निवारण या तीन मुद्द्यांच्या अनुषंगाने समोर आला. त्यामुळे तत्कालीन सामाजिक, राजकीय घडामोडींवर परिणाम झाला होता. म. गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्या त्या काळातील राजकारणावर आणि समाजकारणावर प्रभाव पडला होता. मात्र, त्यांची सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी भिन्न होती. भारताच्या नव्या संविधानाचा विचार करण्यापूर्वी भारतीय प्रतिनिधींना १९३० पासून तीन टप्प्यांत होणाऱ्या गोलमेज परिषदेसाठी लंडनला आमंत्रित केले गेले होते. या परिषदेला डॉ. आंबेडकर अस्पृश्यवर्गाचे प्रतिनिधी म्हणून हजर राहिले होते. काँग्रेसने पहिल्या गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकल्यामुळे ब्रिटिश सरकार आणि काँग्रेस यांच्यातील गतिरोध दूर करण्यासाठी गांधी-आयर्विन करार झाल्यानंतर म. गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेला हजर राहिले होते. दुसऱ्या गोलमेज परिषदेत म. गांधींनी डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यांच्या स्वतंत्र राजकीय हक्कांच्या मागणीला जोरदार विरोध केला होता. त्यामुळे हिंदू समाजाची एकसंधता भंग पावली जाईल. या गोष्टीला म. गांधींनी तीव्र विरोध केला होता. त्यांच्या भूमिकेचे ब्रिटिश आणि डॉ. आंबेडकर यांना मोठे आश्चर्य वाटले होते. अस्पृश्यांच्या स्वतंत्र राजकीय हक्कांना ब्रिटिशांनी मान्यता दिली होती. अस्पृश्यांच्या स्वतंत्र राजकीय अस्तित्वाला हिंदूसभा आणि काँग्रेस पक्षातील गणमान्य पुढाऱ्यांनी फारसा विरोध दर्शविला नव्हता. मात्र, गांधींनी याबाबत टोकाचा विरोध दर्शविला होता. जातीय निवाड्यानुसार अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाला मान्यता मिळाल्यानंतर या निर्णयाविरोधात म. गांधींनी येरवडा तुरुंगात उपोषणाला सुरुवात केली. गांधींचे प्राण वाचविण्यासाठी अस्पृश्य आणि हिंदू पुढारी यांच्यातील तडजोडीतून पुणे करार अस्तित्वात आला. त्यानुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघांऐवजी राखीव मतदारसंघ मिळाले. परिणामी, अस्पृश्यांच्या राजकारणाला एक वेगळी दिशा मिळाली. डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यांचे नेते म्हणून मान्यता मिळाली. नंतरच्या काळात काँग्रेस आणि हिंदू पुढाऱ्यांनी डॉ. आंबेडकरांना वेळोवेळी राजकीय कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर विविध आरोप केले गेले आणि त्यांच्या विरोधी प्रचार केला गेला. अस्पृश्यांनी स्वसमर्थ्यावर आपली क्षमता विकसित केल्याशिवाय आणि विषमतावादी हिंदू समाजव्यवस्थेशी दोन हात केल्याशिवाय अस्पृश्यांची गुलामगिरीतून मुक्तता होणार नाही, याची आंबेडकरांना जाणीव झाली. म. गांधींनीसुद्धा अस्पृश्यता निवारण ही स्वराज्याच्या पात्रतेची आवश्यक अट मानली होती. परंतु, गांधीजींचा अस्पृश्यता निवारण कार्यक्रम अस्पृश्यांच्या सक्षमीकरणापेक्षा सुधारणावादी होता.

नंतरच्या प्रकरणातून गोलमेज परिषदेतील डॉ. आंबेडकर यांची भूमिका, महात्मा गांधींची आणि अन्य प्रतिनिधींच्या भूमिका यांची सविस्तर चर्चा केली आहे. पुणे कराराची पार्श्वभूमी आणि त्याबाबतीतील तीव्र मतभेद यांची सविस्तर चर्चा केली आहे. वर्णव्यवस्था-जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता निवारण याबाबतीतील गांधी यांचे विचार आणि उपाय कसे फलदायी होणार नाहीत, याविषयीची आंबेडकरांची भूमिका ठाम आणि महत्त्वाची होती. कालांतराने दोन्ही नेत्यांना आपली भूमिका काळानुरूप बदलावी लागली होती. डॉ. आंबेडकरांशी वैचारिक मतभेद असूनही म. गांधींनी त्यांचे मोठेपण आणि विद्वत्ता जाणली होती. म्हणूनच त्यांच्या आग्रहामुळे स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात आंबेडकरांना महत्त्वाचे स्थान मिळाले. तसेच भारतीय घटना निर्मितीच्या प्रक्रियेत त्यांना समाविष्ट केले गेले. नंतरचा इतिहास आपण जाणतोच. प्रा. कोकणे यांच्या या पुस्तकामुळे त्या काळातील संघर्षाची आणि तत्कालीन परिस्थितीची उत्तम जाणीव होते. पुस्तकातील राहून गेलेले लहान-मोठे, विपुल मुद्रणदोष टाळणे आवश्यक होते. शेवटी संदर्भग्रंथ सूची आणि मलपृष्ठावर लेखक परिचय सचित्र करून दिला आहे. प्रा. कोकणे हे सध्या सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून जे.एस.एम. कॉलेज अलिबाग, जिल्हा रायगड येथे कार्यरत आहेत. **

**पुस्तकाचे नाव : म.गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैचारिक संघर्ष**
**लेखक : डॉ. आय. पी. कोकणे प्रकाशक : वेद मुद्रा प्रकाशन, अमरावती**
**प्रथमावृत्ती : ५ मे २०२३ (बुद्ध जयंती)**
**पृष्ठे : १७० मूल्य : रु.३००/-**

# सरकारी बहिणींची वणवण थांबणार कधी?

**लाडकी बहीण योजनेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. तरुणींसह ६५ वर्षांच्या महिला या योजनेचा लाभ घेण्यासाठी धडपड करत आहेत. प्रशासनाकडूनदेखील त्याची जनजागृती मोठ्या प्रमाणात केली जात आहे. अंगणवाडी सेविकांच्या मदतीने या योजनेचे ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज भरले जात आहे. मात्र, योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी लाडक्या बहिणींची मोठी वणवण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यांची ही वणवण कधी थांबणार, असा प्रश्न सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.**

प्रमोद जाधव

राज्य सरकारने उत्तराखंडच्या धर्तीवर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली. एक जूनपासून या योजनेला सुरुवात झाली. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळू लागला. २१ ते ६५ वयोगटातील तरुणी, महिलांना दर महिन्याला एक हजार पाचशे, म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये बहिणींच्या खात्यात जमा होणार आहेत. या योजनेसाठी सुरुवातीला उत्पन्नाचा दाखला, वय अधिवास दाखल्याची अट ठेवण्यात आली होती. ते दाखले मिळविण्यासाठी महिलांनी तहसील कार्यालयासह सेवा केंद्रामध्ये मोठी गर्दी केली होती. हे दाखले मिळविण्यासाठी तलाठी कार्यालयात महिलांची धावाधाव सुरु झाली. हे दाखले देण्यासाठी प्रशासनाची मोठी दमछाक झाली. परंतु, बहिणींची ही गर्दी लक्षात घेता, सरकारने या योजनेत काही प्रमाणात बदल केला. उत्पन्नाचा व वय अधिवास दाखल्याची अट रद्द करण्यात आली. त्यामुळे दाखल्यांसाठी खर्च केलेले पैसे पाण्यात गेले. त्यात काहींनी दाखले परत घेण्याची इच्छाही दाखविली नाही.

मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजनेसाठी आधारकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, हमीपत्र, रेशनकार्ड, बँक पास बुक व लाभार्थ्याचा फोटो अशी अट लागू केली. ही योजना प्रभावीपणे ग्रामीण व शहरी भागात राबवण्यात यावी यासाठी तालुका स्तरावर अंगणवाडी सेविकांच्या बैठका घेण्यात आल्या. त्यांच्या मदतीने ऑफलाईन व ऑनलाईन अर्ज भरणे, ते अर्ज स्वीकारण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी रात्रीचा दिवस करून या योजनेची जनजागृती केली. अनेक अंगणवाडी सेविकांनी आपल्या बहिणींना ऑफलाईन व ऑनलाईन अर्ज भरून दिले. मात्र, अनेक वेळा सर्व्हरची समस्या निर्माण झाल्याने काही अंगणवाडी सेविकांनी स्वतःकडील इंटरनेट डाटा बहिणींना लाभ मिळावा यासाठी संपविला.



लाडकी बहीण योजनेसाठी बँक आधार लिंक, मोबाईल नंबर आधार लिंक असणे बंधनकारक केल्याने सेवा केंद्रामध्ये आधार लिंक करण्यासाठी गर्दी होऊ लागली. बँकांमध्ये नव्याने खाते उघडण्यासाठी धावाधाव सुरु झाली. अचानक खाते उघडण्यासाठी गर्दी झाल्याने बँक प्रशासनाचीदेखील मोठी दमछाक उडाली. दोन दिवसांनी मिळणारे बँक पास बुक पंधरा दिवसांनी मिळू लागले. बँक खाते ऑनलाईन उघडताना आधारकार्डवर पूर्ण जन्मतारीख नसल्याने पुन्हा लाडक्या बहिणींना सेवा केंद्रात जाऊन त्याची नोंद करावी लागली.

कित्येक वर्षे शाळा सोडल्याचा दाखला काढला नाही आणि दाखला काढूनही त्याकडे लक्ष न दिल्याने तो कोपऱ्यात पडून राहिला. त्या दाखल्याची शोधाशोध सुरु झाली. अनेक वेळा दाखले गहाळ झाले. त्यामुळे पुन्हा शाळा सोडल्याचा दाखला काढण्यासाठी तहसील कार्यालयात जाऊन प्रतिज्ञापत्र तयार करून तो शाळेत देणे अशा या प्रक्रियेमुळे लाडक्या बहिणींना धावाधाव करावी लागली. शाळेतून दाखला मिळविणे, बँकेत नव्याने खाते उघडणे, मोबाईल नंबर, बँक पास बूक आधार लिंक करणे या प्रक्रियेचा प्रचंड मनस्ताप बहिणींना होत आहे.

आतापर्यंत चार लाख तीन हजार ४८ महिलांनी अर्ज भरले आहेत. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज स्वीकारण्याची मुदत सरकारने ठेवली आहे. त्यासाठी अवघे २० दिवस शिल्लक राहिले आहे. त्यामुळे महिलांची आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. मात्र, एक ऑगस्टपासून 'नारी शक्ती दूत' या ॲपचे सर्व्हर डाऊन झाले आहे. ऑनलाईन अर्ज भरून ते स्वीकारले जात नाही. त्यामुळे तासन्तास लाडक्या बहिणींना प्रतीक्षा करावी लागत आहे. काही महिला तर पहाटे अथवा मध्यरात्री जागून योजनेचा अर्ज भरत आहेत. तरीदेखील अर्ज ऑनलाईन स्वीकारला जात नाही. योजनेची अर्ज भरण्याची प्रक्रिया ठप्प झाली आहे. योजनेचे संकेतस्थळ बंद पडले आहे. त्यामुळे बहिणींची धाकधूक वाढली आहे. ३१ ऑगस्ट ही योजनेची शेवटची तारीख आहे. मात्र, वेबसाईट बंद पडल्याने आपला अर्ज भरला जाणारा की नाही, योजनेचा लाभ मिळणार की नाही, अशी चिंता बहिणींना लागून राहिली आहे. बंद पडलेले संकेतस्थळ कधी सुरू होणार याकडे त्यांचे डोळे लागून राहिले आहे.

नारीशक्ती दूत ॲप सुरळीत करून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरळीत करावी, अशी मागणी होत आहे.

सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना राबवून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबाबत सर्व स्तरातून कौतुक होत आहे. मात्र, महिलांची होणारी वणवण कधी थांबणार, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहे.

योजनेसाठी लागणारे कागदपत्रे गोळा करताना प्रचंड मनस्ताप होत आहे. अनेकवेळा या महिलांना दुय्यम दर्जाची वागणूकही काही कार्यालयांकडून दिली जात आहे, अशा अनेक समस्यांना महिलांना तोंड द्यावे लागत आहे, त्याकडे मात्र सरकारने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. **

# आंदोलनातून सरकारला इशारा



सुधीर दाणी

पवित्र आदर्श विद्यामंदिरात तीन-चार वर्षांच्या निरागस बालिकेवर लैंगिक अत्याचाराविरोधात कुठल्याही राजकीय समर्थनाशिवाय, सहभागाशिवाय उत्स्फूर्तपणे आंदोलन केलेल्या सर्व आंदोलकांचे जाहीर अभिनंदन.

अलीकडच्या काळात जनता सुस्त आहे आणि म्हणून प्रशासन, सरकार निर्धास्त असल्याचे अनेक प्रकरणात दिसून आलेले आहे. परंतु, भविष्यात असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा खणखणीत इशारा आंदोलकांनी देऊन सरकारला जाग आणली आणि त्यानंतर सरकारने गुन्हा नोंदवून घेण्यास विलंब करणाऱ्या संबंधित पोलीस ठाण्यामधील अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे, एसआयटी स्थापनेचे आदेश दिले. मुळात, प्रश्न हा आहे की, प्रत्येक वेळी काही घटना घडली की लोकप्रतिनिधींकडून आदेश येण्याची गरजच काय? प्रत्येक प्रशासकीय व्यवस्थेला आपले कर्तव्य, अधिकार ज्ञात असतात आणि ते त्यांनी त्यानुसार कार्यवाही करणे अभिप्रेत असताना वारंवार यंत्रणेकडून दिरंगाई केली जाते.

शाळेतील सीसीटीव्ही बंद असल्याचे सांगितले जाते आहे. शिक्षण विभागात अनेक अधिकारी आहेत, पण ते कधीच शाळांना भेट देत नसल्याने खासगी शाळांची मनमानी सुरु आहे. शिक्षण विभागाचा धाकच संस्थाचालकांना उरलेला नाही.

जनतेला गृहीत धरून सरकारी यंत्रणा वागत असल्याने चांद्यापासून बांद्यापर्यंत कोणत्याच प्रशासकीय यंत्रणेचा धाक उरलेला नाही. जनतेचा उद्रेक झाल्यावर आता विविध लोकप्रतिनिधी गुन्हेगारांना शिक्षा द्या, अशा प्रकारची पोपटपंची करताना दिसले. पण, हे वास्तव जनता जाणून आहे की, बहुतांश घटनांमध्ये गुन्हेगारांना स्थानिक लोकप्रतिनिधींचा वरदहस्त असल्यानेच तेच अनेक वेळेला पोलीस यंत्रणेला गुन्हे नोंदवून न घेण्याचे 'आदेश' देत असतात. अत्यंत कटू वास्तव हे आहे की, आपल्या देशातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनीच यंत्रणा नासवलेल्या आहेत. लाडकी बहीण योजनेचे पैसे नकोत, बहिणींना सुरक्षितता द्या, या प्रकारचे फलक सरकारच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आहेत.

असो! कोळसा कितीही उगाळला तरी काळाच! पण, आता सर्वच लोकप्रतिनिधींनी बोध घ्यावा आणि भविष्यात गुन्हेगारीला पाठीशी घालण्याचे 'उद्योग' बंद करावेत. जनता जागृत झालेली आहे, हे ध्यानात घ्या! **



# पॅरालिम्पिकमध्ये पदकांचा चौकार



। पॅरिस । वृत्तसंस्था ।
पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतासाठी शुक्रवारचा दिवस खास ठरला आहे. कारण या दिवशी भारताच्या खात्यात चार पदकांची भर पडली असून नेमबाजांनी हा दिवस गाजवला आहे. यात नेमबाज अवनी लेखराने ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकले आहे. तिचे हे पॅरालिम्पिकमधील दुसरे सुवर्णपदक ठरले आहे. याशिवाय तिच्याच क्रीडा प्रकारात मोना अगरवाल हिनेही कांस्य पदकाला गवसणी घातली आहे. तसेच, पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तुल १ प्रकारात मनीष नरवालने रौप्य पदक पटकावले. यामुळे एकाच दिवसात भारताला नेमबाजीतून तीन पदके मिळाली आहेत. इतकंच नाही तर महिलांच्या ३५ १०० मीटर प्रकारात प्रीती पालने देखील कांस्य पदक जिंकले आहे. ती ॲथलेटिक्सच्या ट्रॅक प्रकारात पदक जिंकणारी भारताची पहिलीच खेळाडू ठरली आहे. दरम्यान, या चारही खेळाडूंचा इथपर्यंतचा प्रवास सोपा नव्हता. त्यांनी अत्यंत जिद्दीने खेळ करत अडथळे पार करत हा टप्पा गाठला आहे.




## अवनी लेखराचा ‘सुवर्ण’ वेध



पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये शुक्रवारी (दि.३०) भारताच्या खात्यात पहिले पदक आले. भारताच्या अवनी लेखरा हिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टॅन्डिंग १ प्रकारात सुवर्ण पदकाला गवसणी घातली आहे. याच प्रकारात भारताच्या मोना अगरवालने कांस्य पदक जिंकले आहे. अवनीचे हे दुसरे सुवर्णपदक असून तिने टोकियोमध्ये झालेल्या पॅरालिम्पिकमध्येही सुवर्णपदक जिंकले होते. त्यामुळे ती पॅरालिम्पिकमध्ये दोन सुवर्णपदक जिंकणारी पहिलीच भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. तिने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर रायफल ३ पोझिशनमध्ये देखील कांस्य पदक जिंकले होते. तिने आशियाई क्रीडा स्पर्धेतही सुवर्ण पदक जिंकले होते. अवनीने अंतिम फेरीत सुरुवातीपासूनच चांगली वय पकडली होती. तिने २४९.७ गुण मिळवत सुवर्ण पदक जिंकले. तसेच, रौप्य पदक जिंकलेल्या कोरियाच्या युन्री ली हिने २४६.८ गुण मिळवले आहेत. तसेच, मोनाने २२८.७ गुण मिळवले आहेत.

## प्रीती पालची ‘कांस्य’ झेप




भारतासाठी प्रीती पाल हिने पॅरिस पॅरालिंपिकमध्ये ॲथलेटिक्समधील पदकाचे खाते उघडले आहे. तिने महिलांची १०० मीटर शर्यत (टी) १४.२१ सेकंद अशा वेळेत पूर्ण करीत कांस्यपदकाला गवसणी घातली आहे. तिने वैयक्तिक सर्वोत्तम वेळेसह हे पदक पटकावले आहे. मुझफ्फरनगरमधील प्रीती पाल ही एका शेतकरी कुटुंबातील आहे. जन्माच्या ६ दिवसातच तिच्या शरिराचा खालचा भाग कमकुवत असल्याचे समोर आले होते. तिच्या पायात ताकद यावी यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले होते. परंतु, त्याचा फारसा फायदा झाला नाही. तिनेही परिस्थितीपुढे हार न मानता वयाच्या १७ व्या वर्षी पॅरालिम्पिक पाहत असताना तिला प्रेरणा मिळाली. तिला पॅरालिम्पिक खेळाडू फातिमा खातून यांना भेटण्याची संधी मिळाली. तिने त्यांच्या मदतीने राज्य पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशीप २०१८ स्पर्धा खेळली. ती आशियाई क्रीडा स्पर्धेत १०० आणि २०० मीटरमध्ये चौथ्या क्रमांकावर राहिली. पण तिने आणखी प्रयत्न केले. ती प्रशिक्षक गजेंद्र सिंग यांच्याकडून मार्गदर्शन घेण्यासाठी दिल्लीला आली. तिने नंतर वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशीपमध्ये १०० आणि २०० मीटर प्रकारांमध्ये कांस्य पदक जिंकत पॅरिस पॅरालिम्पिकसाठीही दावेदारी ठोकली होती.

## मनिषचा ‘रौप्य’ निशाणा



पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताचा नेमबाज मनीष नरवाल याने रौप्यपदक जिंकले आहे. मनीष नरवालने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तुल १ प्रकारात हे पदक जिंकले आहे. नेमबाजीतील भारताचे हे आत्तापर्यंतचे यंदाच्या पॅरालिम्पिकमधील तिसरे पदक आहे. मनीषने अंतिम फेरीत २३४.९ गुण मिळवत रौप्य पदकावर हक्क सांगितला. त्याला कोरियाच्या जोंगडू जो याने मागे टाकत सुवर्ण पदक जिंकले. हरियाणातील मनिष नरवाल याला जन्मत: दिव्यांगत्व आले होते. त्याच्या उजव्या हाताला अपंगत्व आहे. त्याला फुटबॉलमध्येही खूप रस होता. तो स्थानिक क्लबसाठीही खेळायचा, पण त्याच्या दिव्यांगत्वामुळे त्याला पुढे फार काही करता आले नाही. त्याच्या वडिलांनी त्याला राकेश ठाकुर यांच्या शूटिंग ॲकेडमीत दाखल केले. त्यांनी त्याला नेमबाजीचे धडे दिले. मनिषची भाऊ शिवा आणि बहीण शिखा हे देखील भारतासाठी नेमबाजी करतात. शिवाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकही मिळवले होते, तर जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद २०२१ या स्पर्धेत शिखाने सुवर्ण पदक जिंकले होते. तसेच, मनिषने आत्तापर्यंत केलेल्या कामगिरीमुळे त्याला खेलरत्न आणि अर्जुन पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले.

## मोनाची कांस्यपदकावर मोहोर



मोना अगरवाल हिने अवनी लेखरा खेळत असलेल्या महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टॅन्डिंग १ या प्रकारात कांस्यपदक पटकावले आहे. जयपूरची मोना अगरवाल ९ महिन्यांची असतानाच तिला पोलिओ झाला होता. आणि त्यामुळे तिला दिव्यांगत्व आले आहे. पुढे तिचं लग्न भारताचा माजी व्हिलचेअर बास्केटबॉल खेळाडू रविंद्र चौधरीबरोबर झाले. तिला तिच्या आजीनेही मोठा पाठिंबा दिला. मोना हिला लग्नानंतर अविक आणि आरवी हे मुलंही आहे. पण तिने २०२१ मध्ये नेमबाजीत करियर करायचं ठरवलं आणि तिने पॅरालिम्पिकपर्यंत धडही मारली.

# तिरंदाजीत शीतल देवीचा ‘पाय’गुण



। पॅरिस । वृत्तसंस्था ।
पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत यावेळी सर्वांचे लक्ष होते ते तिरंदाज शीतल देवी हिच्या कामगिरीवर. १७ वर्षांच्या या पोरीने जगाला आपल्या तिरंदाजीच्या कौशल्याने चकित करून टाकले आहे. जन्मतः दोन्ही हात नसलेली शीतल पायाने तिरंदाजी करते आणि मागच्या वर्षी आशियाई स्पर्धेत सुवर्ण जिंकून तिने इतिहास घडवला होतो. यंदाच्या पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेतही तिने जागतीक विक्रम मोडीत काढला आहे. यावेळी ७०० हून अधिक गुण कमावणारी ती पहिली भारतीय तिरंदाज ठरली आहे. परंतु, अवघ्या एका गुणाच्या फरकाने तिला क्रमांक एकचे स्थान गमवावे लागले आहे.

यावेळी शीतल देवीने पॅरालिम्पिक स्पर्धेत ७२० पैकी ७०३ गुण मिळवून जागतिक विक्रम केला आहे. शीतलने मागच्या पॅरालिम्पिक स्पर्धेत ग्रेट ब्रिटनच्या जेसीका स्ट्रेटॉनचा ६९४ गुणांचा पॅरालिम्पिक विक्रम आणि ग्रेट ब्रिटनच्याच फोबी पॅटरसनचा ६९८ गुणांचा जागतिक विक्रम मोडीत काढला आहे. परंतु, शीतलचा जागतीक विक्रम आजच तुर्कीच्या ओझनूर क्युरने काही क्षणात मोडला आणि तिने ७०४ गुणांसह नवा जागतिक विक्रम आपल्या नावावर केला.

जम्मू आणि काश्मीरमधील शितल देवी ही एका दुर्मिळ जन्मजात आजाराने ग्रासली होती. त्यामुळे तिचे हात अविसकसित राहिले. २०२१ मध्ये तिच्या गावी भारतीय सैन्याने आयोजित केलेल्या युवा कार्यक्रमादरम्यान तिची क्रीडा प्रतिभा शोधली गेली. तिच्या पायांमध्ये ताकद आहे, याची तिला जाणीव झाली. सुरुवातीला तिरंदाजी करताना पाय दुखायचे पण तरी तिने माघार घेतली नाही. तिच्या प्रशिक्षकांनी स्थानिक साहित्य वापरून तिचे किट तयार केले होते.

# भरपावसात विजयी निशाणा

। पॅरिस । वृत्तसंस्था ।
पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताचा दिग्गज तिरंदाज राकेश कुमार याने विजयी धडाका कायम राखताना पुरुष कम्पाऊंड खुल्या गटाच्या उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्याने सेनेगलच्या एलिओ ड्रॅमचा १३६-१३१ असा पराभव केला. या लढतीदरम्यान पॅरिसमध्ये मुसळधार पाऊस पडत होता. परंतु, त्यानंतरही राकेशची एकाग्रता किंचतही हलली नाही. प्रतिस्पर्धी खेळाडूकडे मोठी आघाडी होती, परंतु राकेशने शेवटपर्यंत हार न मानता अनुभवाच्या जोरावर विजय मिळवला.



आशियाई पॅरा स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या राकेशला टोकियो पॅरालिम्पिक स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत हार पत्करावी लागली होती. त्याने पॅरिसमध्ये अचुक १० निशाण साधून चांगली सुरुवात केली आणि पहिल्या टप्प्यात ३ गुणांची आघाडी घेतली. एलिओने दुसरा गेम १ गुणाच्या फरकाने जिंकला आणि त्यानंतर राकेशने तिसरा गेम दोन अचुक १० निशाण साधून ५ गुणांच्या फरकाने खिशात घातला. चौथ्या फेरीनंतर ही आघाडी ६ अशी झाली. एलिओने शेवटप्या फेरीत तीन प्रयत्नांत फक्त १ गुण गमावला. परंतु, राकेशने उल्लेखनीय कामगिरी करून विजय पक्का केला. यापूर्वी राकेश आणि शीतल देवी यांनी मिश्र सांघिक गटात १३९९ गुणांसह विश्व विक्रम नोंदवला होता.

# शाहरुख खानची अंतिम धडक




। पेरू । वृत्तसंस्था ।
गेल्या वर्षी कोरियात झालेल्या ज्युनिअर आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत ३ हजार स्टीपलचेस शर्यतीत रौप्यपदक जिंकणाऱ्या भारताच्या शाहरुख खानने पेरू (लिमा) येथे सुरू असलेल्या जागतिक ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेत स्टीपलचेस शर्यतीत अंतिम फेरी गाठली आहे. मूळचा उत्तर प्रदेशातील असलेल्या १८ वर्षीय शाहरुखने प्राथमिक फेरीत (हीट) सहावे स्थान मिळविताना शर्यत ८ मिनिटे ४५.१२ सेकंदात पूर्ण करत अंतिम फेरी गाठली आहे.

युनिअर आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत दोन हीट झाल्या असून प्रत्येक हीटमधील प्रथम आठ धावपटू अंतिम फेरीसाठी पात्र ठरवण्यात आले आहेत. ही कामगिरी करताना शाहरुखने २० वर्षे वयोगटात भारताच्या नवीन राष्ट्रीय विक्रमाचीही नोंद केली आहे. यापूर्वीचा ८ मिनिटे ५०.१२ सेकंदाचा विक्रम राजस्थानच्या राजेशच्या नावावर होता. यापूर्वी शाहरुखची सर्वोत्तम वेळ ८ मिनिटे ५१.७५ अशी होती. सध्या लखनौ येथे विमल राय यांच्या मार्गदर्शनाखाली तो सराव करत आहे. तसेच, शाहरुखची कामगिरी पाहता अविनाश साबळेनंतर जागतिक पातळीवर त्याला भारताचे आशास्थान म्हणून पाहिले जात आहे.

## जयकुमारकडून आशा

मुलांच्या चारशे मीटर शर्यतीत भारताच्या जयकुमारने अंतिम फेरी गाठून आशा पल्लवित केल्या आहेत. मिश्र रिलेची अंतिम शर्यत धावल्यानंतर तो ४०० मीटर शर्यतीत सहभगी झाला. त्याने हीटमध्ये तिसरे स्थान मिळविताना ४६.९६ सेकंद अशी वेळ दिली.

# गुलवीरकडून जुना विक्रम मोडीत

। नागपूर । प्रतिनिधी ।
गेल्या वर्षी आशियाई क्रीडा स्पर्धा आणि आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत १० हजार मीटर शर्यतीत सेनादलाच्या गुलवीर सिंगने कांस्यपदक जिंकले हाते. त्याने शुक्रवारपासून बंगळूर येथे सुरू झालेल्या ६३ व्या खुल्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत पाच हजार मीटर शर्यतीत ३० वर्षे जुनास्पर्धाविक्रम मोडीत काढला आहे.पुणे येथे आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटमध्ये युनूस खान यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या गुलवीरने ५ हजार मीटर शर्यतीत १३ मिनिटे ५४.७० सेकंद अशी वेळ दिली आणि केवळ दोन शतांश सेकंदाने स्पर्धा विक्रम मोडीत काढला आहे. १९९४ मध्ये चेन्नई येथे झालेल्या स्पर्धेत रेल्वेच्या बहादूरसिंगने नोंदविलेला १३ मि. ५४.७२ सेकंदाचा स्पर्धा विक्रम आता इतिहासजमा झाला आहे.



## पुतळा नव्हे ‘स्मृतिशिल्प’

। मुंबई । प्रतिनिधी ।
रमाकांत आचरेकर यांच्या सानिध्यात व मार्गदर्शनाखाली भारताचे दिग्गज खेळाडू निर्माण झाले. आचरेकर यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र सरकारच्या नगरविकास विभागाकडून त्यांचे स्मृतिशिल्प उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मात्र, हा पुतळा नसून येथे रमाकांत आचरेकर यांची सुप्रसिद्ध टोपी, चेंडू, बॉल, स्टम्प, हेल्मेट व ग्लोव्हस असणार आहेत. शिवाजी पार्क येथील गेट क्रमांक पाच येथे रमाकांत आचरेकर यांचे स्मृतिशिल्प उभारले जाणार आहे.

# अल्काराझची विजयी मालिका खंडित



। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।
स्पेनचा युवा स्टार टेनिसपटू कार्लोस अल्काराझ याला शुक्रवारी (दि.३०) पराभवाचा धक्का बसला आहे. नेदरलँड्सच्या बोटीक वॅन डी झँडस्कल्प याने अल्काराझ याच्यावर ६-१, ७-५, ६-४ अशी सरळ तीन सेटमध्ये मात केली आणि पुढल्या फेरीत प्रवेश केला आहे.

अल्काराझ याने यावर्षी फ्रेंच ओपन व विम्बल्डन या दोन ग्रँडस्लॅमच्या जेतेपदावर मोहोर उमटवली होती. मात्र, अमेरिकन ओपन स्पर्धा जिंकण्याच्या त्याच्या आशांवर पाणी फेरले गेले. याआधीपर्यंत अल्काराझ याने ग्रँडस्लॅममध्ये सलग १५ सामन्यांत विजय साकारला होता. मात्र, त्याची ही विजयी मालिका खंडित झाली आहे.

कार्लोस अल्काराझ याने यंदा फ्रेंच ओपन व विम्बल्डन या दोन ग्रँडस्लॅमच्या विजेतेपदावर मोहोर उमटवत आपली धमक दाखवली होती. पॅरिस ऑलिंपिकमधील टेनिस या खेळातील पुरुष एकेरी विभागात त्याने अंतिम फेरीपर्यंत मजल मारली होती, पण नोवाक जोकोविचकडून पराभवाचा सामना करावा लागला होता.

# आरतीची ‘अजिंक्य’ कामगिरी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
२० वर्षांखालील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत आरतीने १० हजार मीटर चालण्याच्या शर्यतीत कांस्यपदक जिंकून भारताचे खाते उघडले आहे. यंदाच्या जागतिक स्पर्धेतील भारताचे हे पहिलेच पदक ठरले आहे. या स्पर्धेत आरतीने ४४ मिनिट ३९.३९ सेकंदाची नोंद करताना नवीन राष्ट्रीय विक्रम नोंदवला आहे. आरतीने तिच्या आधीच्या ४७:२१.०४ सेकंदाच्या वेळेत ३ मिनिटांची सुधारित वेळ नोंदवली आहे. ही कामगिरी तिने मार्च महिन्यात झालेल्या नॅशनल फेडरेशन चषक स्पर्धेत केली होती. तेव्हा तिने सुवर्णपदक जिंकले होते.

तसेच, पुरुषांच्या ४ बाय ४०० मीटर रिले स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली आहे. रिहान चौधरी, अंकुल, अबिराम प्रमोद आणि जय कुमार यांनी ३ मिनेट ८.१० सेकंदाच्या वेळेसह २० वर्षांखालील स्पर्धेतील राष्ट्रीय विक्रम नावावर केला आहे. या कामगिरीसह त्यांनी हिटमध्ये दुसरे स्थान पटकावून अंतिम फेरीत स्थान जिंकले आहे. दरम्यान, महिलांच्या ४ बाय १०० मीटर रिले हिटमध्ये रुजूला अमोल भोसले. नोओले कोर्नेलिओ, अबिनया राजराजन आमि सुदीक्षा वद्लूरी यांनी नवा राष्ट्रीय विक्रम नोंदवला आहे. त्यांनी ४५.३१ सेकंदात ही शर्यत पूर्ण केली. मात्र, थोडक्यासाठी त्यांना अंतिम सामन्याला मुकावे लागले आहे.

स्पर्धेतील भारताची एकूण कामगिरी संमिश्र असली तरी, या काही अलीकडच्या यशामुळे आशादायक चित्र निर्माण झाले आहे. १७ वर्षीय पूजाचा महिलांच्या उंच उडीमध्ये २० राष्ट्रीय विक्रम आणि शारुक खानचा ३ हजार मीटर स्टीपलचेसमध्ये विक्रम, यामुळे भारतीय संघ मागील आवृत्तीत जिंकलेल्या तीन पदकांशी बरोबरी किंवा तो विक्रम मोडू शकतो, अशी शक्यता निर्माण झाली आहे.




## ज्योतीचा विदर्भ ते पॅरिस थक्क करणारा प्रवास

# महाराष्ट्राच्या लेकीची प्रेरणादायी सायकलस्वारी



। पॅरिस । वृत्तसंस्था ।
पॅरिसमध्ये पॅरालिम्पिक स्पर्धेत गुरुवारी (दि.२९) भारताकडून ज्योती गदेरिया सायकल ट्रॅकवर उतरली होती. ती ज्यावेळी सायकल ट्रॅकवर उतरली, त्याचवेळी तिच्या नावावर एक मोठा विक्रम झाला. ती पॅरालिम्पिकमध्ये सहभागी होणारी भारताची पहिलीच सायकलिस्ट ठरली आहे. यापूर्वी अशी कामगिरी भारताकडून कोणालाच करता आली नव्हती. ती गुरुवारी पॅरा ट्रॅकच्या महिलांच्या १-३ तीन हजार मीटर प्रकारात सहभागी झाली होती. परंतु, ती १० व्या क्रमांकावर राहिल्यामुळे तिला पदकापासून दूर रहावे लागले. परंतु, असे असले तरी तिने या स्पर्धेत सहभागी होणेच मोठी गोष्ट आहे.

दरम्यान, ती पॅरालिम्पिक स्पर्धेत पॅरा-रोड सायलिंग प्रकारातही सहभागी होणार आहे. तिच्यासह यंदा सायलिंगमध्ये हैदराबादचा शेख अर्शदही पॅरालिम्पिक २०२४ स्पर्धेत खेळणार आहे.

ज्योती गदेरिया महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील डोंगरगावमधील असून शेती हा तिच्या कुटुंबाचा मुख्य व्यावसाय आहे. तिला लहानपणापासूनच खेळात रस होता. ती उत्तम कबड्डी खेळायची. परंतु, २०१६ साली तिचा गंभीर अपघात झाला. या अपघातात तिने तिचा डावा पाय गमावला. या अपघाताचा आघात तिच्या मनावर झाल्याने ती दोन वर्षे नैराश्यात होती. पण हळुहळू यातून सावरत तिने सायकल चालवण्यास सुरुवात केली.

ज्योतीगदेरियासायकलचालविता चालविता यातच करियर करायचे ठरवले. याआधी तिने पॅरा रोइंगमध्येही प्रयत्न केले होते. तिने त्यातही २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर कांस्य पदक पटकावले होते. परंतु, तिने नंतर सायकलिंगलाच प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. त्यात ज्योतीने अनेक आंतरराष्ट्रीय पदके जिंकली आहेत. तसेच, हैदराबादमधील आदित्य मेहता फाऊंडेशनच्या मदतीमुळे तिने हैदराबादमध्ये सरावाला सुरुवात केली. त्यांनी ज्योतीची ट्रेनिंगसह सर्वच जबाबदारी उचलली. ती आंतरराष्ट्रीय स्तरावर तिची प्रतिभा सिद्ध करत असाताना तिने २०२२ मध्ये पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली होती. या यशासह तिने पॅरिस पॅरालिम्पिकची पात्रताही मिळवली. त्यानंतर आता ती पॅरिसमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना दिसत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)